## आसामच्या अतिरेकी संघटनांसोबत शांतता करार

**नवी दिल्ली :** केंद्र सरकार, आसाम राज्य सरकार व उल्फा (युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम)



या संघटनेमध्ये तब्बल १२ वर्षांपासून सुरू असलेल्या वाटाघाटीनंतर शुक्रवारी (दि. २९) दिल्लीत ऐतिहासिक त्रिपक्षीय शांतता करारावर स्वाक्षरी झाल्या आहेत. यात उल्फाच्या कट्टर गटाने मात्र चर्चेत भाग घेतला नाही. या करारामुळे उल्फा बंडखोर मुख्य प्रवाहात येतील तसेच पूर्वोत्तर राज्यांमध्ये शांतता निर्माण होण्यात मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा व उल्फांच्या प्रतिनिधींमध्ये हा करार झाला. शुक्रवारी झालेल्या ऐतिहासिक शांतता करारानंतर आसाममधील सशस्त्र बंडखोरी कमी होण्यास मदत होईल, असा दावा केला जात आहे.


रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १६ ◆ अंक १६३

www.ramprahar.com

# राम प्रहर

शनिवार, ३० डिसेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


### अंतरंग


मध्य रेल्वेवर उभारण्यात येणार नवे स्थानक/२

पनवेलच्या ग्रामीण भागात विकासरथ/३

पाकिस्तानचा कसोटी सामन्यात दारूण पराभव/८


# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा

## राज्यात पीक कर्ज वसुलीला सरकारकडून स्थगिती

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील दुष्काळग्रस्त भागात पीक कर्ज वसुलीला राज्य शासनाने स्थगिती दिली आहे. राज्यातील दुष्काळी आणि दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित केलेल्या ४० तालुक्यांमध्ये तसेच इतर तालुक्यांमधील १०२१ महसुली मंडळांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला होता, पण आता या भागातील पीक कर्ज वसुलीसाठी स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

राज्यात आधी झालेल्या अतिवृष्टीमुळे आणि त्यानंतर उद्भवलेल्या दुष्काळ सदृश्य परिस्थितीमुळे राज्यातील ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला होता. त्याचप्रमाणे ज्या महसुली मंडळामध्ये जून ते सप्टेंबर २०२३ या



कालावधीमध्ये सरासरी पर्जन्याच्या ७५ टक्के कमी पाऊस झाला, त्या भागामध्ये दुष्काळ जाहीर केला गेला. तसेच आता या दुष्काळी भागामध्ये उपाययोजना आणि सवलती लागू करण्याचेदेखील निर्देश देण्यात आले आहेत.

ज्या तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात येणार आहे, तिथे कोणत्या सवलती देण्यात येतील याविषयीदेखील माहिती देण्यात आली आहे. या तालुक्यांमध्ये जमीन महसुलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू विजबिलात ३३.५ टक्के सूट, शालेय अथवा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर, टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीजजोडणी खंडीत न करणे अशा या सवलती लागू होतील.

यापूर्वी काही तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसाक्षर दुष्काळ जाहीर करण्याबाबतचा शासन आदेश सरकारने शुक्रवारी जाहीर केला. यामध्ये एकूण ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला.

**या जिल्ह्यांमध्ये अंमलबजावणी**

नंदुरबार, धुळे, जळगाव (चाळीसगाव), बुलढाणा (बुलढाणा, लोणार), जालना (भोकरदन, जालना, बदनापूर, अंबड, मंठा), छत्रपती संभाजीनगर (सोयगाव, छत्रपती संभाजीनगर), नाशिक (मालेगाव, सिन्नर, येवला), पुणे (पुरंदर, सासवड, बारामती, शिरूर घोडनदी, दौंड, इंदापूर) बीड (वडवणी, धारूर, अंबेजोगाई), लातूर (रेणापूर), धाराशिव (वाशी, धाराशिव, लोहारा), सोलापूर (बार्शी, माळशिरस, सांगोला, करमाळा, माढा तालुका), सातारा (वाई, खंडाला), कोल्हापूर (हातकंगले, गढहिंगलज), सांगली (शिराळा, कडेगाव, खानापूर विटा, मिरज).

# कामोठ्यातून नेपाळमध्ये गेलेल्या भाविकांची फसगत

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे सुटका

**मुंबई : प्रतिनिधी**





पनवेल तालुक्यातील कामोठे गावातील ५८ भाविक नेपाळमध्ये धार्मिक पर्यटनासाठी गेले होते. या भाविकांची एका पर्यटन कंपनीने फसवणूक करून तेथेच अडकवून ठेवले होते. ही बाब उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना समजताच त्यांनी तत्काळ सूचना देत काठमांडूमध्ये अडकलेल्या सर्व भाविकांना सुखरूप घरी आणले.

भाविक संजू म्हात्रे यांनी सांगितले की, आम्ही कामोठे गावातून ५८ भाविक नेपाळमध्ये धार्मिक पर्यटनासाठी गेले होतो. ३५ महिला आणि २३ पुरुष त्यामध्ये होतो. गोरखपूरहून नेपाळपर्यंत सगळे व्यवस्थित पोहचलो. लुंबीनी, पोखरा, जनकपुरी, मनोकामना या ठिकाणी दर्शन घेतले, मात्र काठमांडूला आल्यावर आम्हाला राधाकृष्ण ट्रॅव्हल्सच्या एका बसमध्ये कोंबण्यात आले.

भाविकांनी गावाहून निघतानाच सर्व पैसे भरलेले होते, मात्र त्यांची फसवणूक झाली होती. तुमच्या पर्यटन कंपनीकडून पैसे आले नाहीत. सहा लाख रुपये दिले नाहीत तर सोडणार नाही असे या ट्रॅव्हल्सचा मालक अंकीत जयस्वाल आणि त्याच्या साथीदारांनी धमकवायला सुरुवात केली. परक्या गावात उद्भवलेल्या या प्रसंगामुळे काय करायचे हा प्रश्न या भाविकांसमोर उभा राहिला. त्यांनी ओळखीच्या लोकांमार्फत नेत्यांना आणि त्यांच्या पीएंना फोन करायला सुरुवात केली, पण त्यांच्याकडून प्रतिसाद मिळेना. शेवटी संजू म्हात्रे यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांना मेसेज करून आपल्यावर ओढावलेला प्रसंग सांगितला. त्यांचा तातडीने प्रतिसाद आला. त्यांनी माहिती घेतली. लगेचच उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे खासगी सचिव दिलीप राजूरकर आणि दिल्लीतील स्वीय सहायक मनोज मुंडे यांनी या भाविकांशी संपर्क साधला.

उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या टीमने मूळचे नेपाळचे असलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे माजी स्वीय सहाय्यक संदीप राणा यांना कळविले. राणा यांनी स्वत: या भाविकांची भेट घेतली व सर्व भाविकांची व्यवस्था करून विशेष बसने त्यांना गोरखपूरला पोहचविले. देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याशी संपर्क साधला होता. त्यामुळे भाविक गोरखपूरला पोहचल्यावर तेथील जिल्हाधिकारी स्वत: भेटीला आले. त्यांनी दोन दिवस भाविकांची निवासाची आणि भोजनाची व्यवस्था केली. त्यांना मुंबईपर्यंत कसे न्यायचे प्रश्न होता. त्यामुळे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्र लिहून गोरखपूरपासून मुंबईपर्यंत खास बोगी जोडण्याची विनंती केली. रेल्वेने त्याप्रमाणे भाविकांसाठी गोरखपूरहून मुंबईपर्यंत रेल्वेची एक बोगी आरक्षित करू दिली. दोन दिवस प्रवास करून सर्व जण सुखरुपपणे मुंबईला पोहचले.

# उरणमध्ये विकसित भारत संकल्प यात्रेचा शुभारंभ



**उरण : वार्ताहर**

केंद्र सरकारच्या योजनांचा लाभ सर्व नागरिकांना व्हावा यासाठी विकसित भारत संकल्प यात्रेची सुरुवात सर्वत्र झाली आहे. त्याच पार्श्वभूमीवर उरण तालुक्यातील आवरे गावात आमदार महेश बालदी यांच्या हस्ते विकसित भारत संकल्प यात्रेचा शुभारंभ झाला.

केंद्र सरकारच्या विविध योजनांचा सर्व सामान्य जनतेला एकाच ठिकाणी लाभ मिळावा याकरिता सरकारने पुढाकार घेऊन ग्रामपंचायत स्तरावर संकल्प यात्रा काढण्यात येत आहे. आवरे गावातून यात्रेचा शुभारंभ करण्यात आला. **(पान २ वर..)**

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते आज 'अयोध्या धाम'चे उद्घाटन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी (दि. ३०) पुनर्विकसित अयोध्या धाम जंक्शन रेल्वे स्थानकाचे उद्घाटन करणार आहेत.

यासोबतच दोन नवीन अमृत भारत ट्रेन आणि सहा वंदे भारत ट्रेनला हिरवा झेंडा दाखवतील. यासह इतर अनेक रेल्वे प्रकल्पही राष्ट्राला समर्पित करणार आहेत. यानंतर दुपारी १२.१५ वाजता पंतप्रधानांच्या हस्ते नव्याने बांधण्यात आलेल्या अयोध्या विमानतळाचे उद्घाटन होणार आहे.

अयोध्या विमानतळाला आता 'महर्षि वाल्मिकी आंतरराष्ट्रीय विमानतळ' असे नाव देण्यात आलेय. **(पान २ वर..)**

### निवडक

#### कोरोना : शिर्डीच्या साई मंदिरात मास्क सक्ती

**नाशिक :** कोरोनाच्या नव्या व्हेरीएंटच्या पार्श्वभूमीवर साई संस्थान सतर्क झाले आहे. शिर्डीत साईंच्या दर्शनासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी आता मास्क सक्ती केली आहे. साईंच्या मंदिरात मास्क घालून जाणे बंधनकारक असेल. भाविकांनी दर्शनाला येताना मास्क घालूनच मंदिरात यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

#### कर्नाटकमध्ये एकाच घरात आढळले पाच सांगाडे

**नवी दिल्ली :** कर्नाटक राज्यामध्ये चित्रदुर्ग जिल्ह्यातील एका घरात मृतदेहाचे सांगाडे आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मृतदेहांचे हे अवशेष एकाच कुटुंबातील सदस्यांचे असल्याच म्हटले जातेय. घराच्या अवती-भोवती कडेकोट सुरक्षा बंदोबस्त लावण्यात आला आहे. फॉरेन्सिक अहवाल आल्यानंतरच मृतांची ओळख स्पष्ट होईल. पुढील तपास सुरू आहे.

# महाविकास आघाडीत कुरघोडी सुरूच

## जागावाटपाच्या मुद्द्यावरून काँग्रेसने ठाकरे गटाला डिवचले

**मुंबई : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पराभूत करण्यासाठी एक दिलाने लढण्याच्या कितीही आणाभाका घेतल्या तरी महाविकास आघाडीत कुरघोडी सुरूच आहे. ठाकरे गटाने राज्यातील लोकसभेच्या २३ जागांवर दावा केला आहे. त्यामुळे आघाडीत खळबळ उडाली आहे.

ठाकरे गटाने २३ जागा लढवल्या तर आम्ही किती जागा लढवायच्या? असा सवाल महाविकास आघाडीतून होत आहे. जागा वाटपाच्या मुद्द्यावरून वाद सुरू असतानाच काँग्रेस नेते संजय निरुपम यांनी एक विधान करून ठाकरे गटाला डिवचले आहे. निरुपम यांच्या या विधानाने एकच खळबळ उडाली आहे.



शिवसेना स्वबळावर लोकसभेची एकही सीट निवडून आणू शकत नाही. माझं चॅलेंज आहे. त्यांनी स्वबळावर एक तरी जागा निवडून आणून दाखवावी. ठाकरे गटाला काँग्रेसची गरज आहे आणि काँग्रेसलाही ठाकरे गटाची गरज आहे, असे सांगतानाच ठाकरे गटाने गेल्या निवडणुकीत जेवढ्या जागा जिंकल्या होत्या त्यापैकी अर्धा डझन खासदार पळून गेले आहेत. आता त्यांच्याकडे चार किंवा पाचच खासदार उरले आहेत. तेही त्यांच्याकडे राहणार की नाही याची गॅरंटी नाही, असा दावाच संजय निरुपम यांनी केला आहे.

### निरुपम यांच्याकडून राऊतांना प्रत्युत्तर

ठाकरे गटाकडे उमेदवार नाहीत. दिल्लीचे नेते येऊन निवडणूक लढणार आहेत का?, असा सवाल त्यांनी केला. संजय निरुपम कोण आहेत? असा सवाल खासदार संजय राऊत यांनी केला होता. त्यालाही निरुपम यांनी प्रत्युत्तर दिले आहे. राऊतांपेक्षा अधिक चांगले मला कोण ओळखते? कदाचित राऊत यांची स्मरणशक्ती क्षीण झाली असावी, असा चिमटा त्यांनी काढला.

# सीकेटी महाविद्यालयात सायक्लॉथॉन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाच्या अमृत महोत्सवांतर्गत कन्याकुमारी येथून सुरू झालेली 'महिला शक्ती का सफर' या सायक्लॉथॉनचे स्वागत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात शुक्रवारी (दि. २९) केले.

देशाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त एनसीसी गुजरात डायरेक्टरेक्टच्या वतीने कन्याकुमारी ते दिल्लीपर्यंत आयोजित केलेल्या सायक्लॉथॉनला ८ डिसेंबरपासून सुरुवात झाली असून २० जणांची टीम यामध्ये सहभागी आहे. तीन हजार २३२ किलोमीटरचे अंतर सायकलवरून पार करत या सायक्लॉथॉनची सांगता २१ जानेवारीला दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. दरम्यान, शुक्रवारी ही सायक्लॉथॉन सीकेटी महाविद्यालयात दाखल झाली. या वेळी संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वागत करत सायक्लॉथॉनमध्ये सहभागी झालेल्यांना पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले स्वागत

या वेळी संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, कर्नल व्ही. एम. सिंग, नवीन शर्मा, ब्रिगेडियर एन. एस. चराग, महाविद्यालयाचे प्राचार्य एस. के. पाटील, नीलिमा तीदार, जितेंद्र पवार यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# बोरघाटामध्ये अवजड वाहतुकीत बदल

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

नवीन वर्षाला निरोप देताना सुट्टीचा वार अर्थात रविवार आल्याने प्रचंड संख्येने पर्यटक बाहेर पडणार असून, खंडाळा घाट आणि बोरघाटात होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी बोरघाट पोलीस मदत केंद्राकडून उपाययोजना करण्यात येत आहेत. अवजड वाहनांनी ३० व ३१ डिसेंबर या दोन दिवशी दुपारी १२नंतर प्रवास सुरू करावा, असे आवाहन अवजड वाहन मालक चालक संघटनांना करण्यात आले आहे.

आठवड्यापूर्वी नाताळची सुट्टीदरम्यान पुण्याच्या दिशेने २४ तासांत जवळपास लाखो वाहनांनी प्रवास केला होता. बोरघाट खंडाळा घाटात वाहतूक कोंडीत वाहनांचे क्लच प्लेट जाणे, इंजिनचे काम निघणे प्रकार घडल्याने वाहतूक कोंडी अधिकच वाढली होती.

सलग सुट्ट्या व नवीन वर्षाची सुरुवात त्यामुळे बरचसे प्रवासी हे पर्यटन स्थळावर जात असतात त्यामुळे मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर कारच्या संख्येत लक्षणीय वाढ होणार आहे. नाताळ सुट्टीत वाहतूक

### वाहतूक कोंडी टाळण्यासाठी उपाययोजना; पोलीस केंद्र सज्ज



कोंडीचे परीक्षण केले असता मागील शनिवारी २४ तासांमध्ये ५५,८६८ वाहने द्रुतगती महामार्गावरून गेली. तसेच मुंबई-पुणे जुना महामार्गावरून २१ हजार १३५ वाहने गेली. सर्व वाहनांना घाटामधील संयुक्तिक मार्गाचासुद्धा वापर करावा लागत असल्याने इतक्या प्रचंड प्रमाणात वाहने एकत्र आल्यानंतर घाटामध्ये वाहतूक कोंडी झाली होती.

सर्व जड अवजड वाहन चालक-मालक संघटनांना आवाहन करण्यात आले आहे की, ३० आणि ३१ डिसेंबरला मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर पुणे वाहिनीवरील प्रवास दुपारी १२ नंतर सुरू केल्यास त्यांना घाटामध्ये थांबण्याची गरज पडणार नाही तसेच वाहतूक कोंडीमुळे या वाहनांचे क्लच प्लेट जाणे, इंजिनचे काम निघणे इत्यादी टळू शकेल तसेच इंधन व वेळची बचत होईल.

**सलग सुट्टी आल्यामुळे घाटामधील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी घाट सुरू होण्यापूर्वी जड अवजड वाहनांना थांबविण्यात येते. वाहतूक कोंडी सूटल्यानंतर जड अवजड वाहने मार्गस्थ करण्यात येतात.**

**-योगेश भोसले, सपोनि, बोरघाट पोलीस मदत केंद्र**

## 'भाजपच्या विजयाचे श्रेय कार्यकर्त्यांच्या मेहनतीला'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



निवडणुकांमध्ये भाजपच्या विजयाचे श्रेय मला देणे चुकीचे ठरेल, याचे श्रेय आमच्या कार्यकर्त्यांना आणि त्यांच्या मेहनतीला जाते, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना एका मुलाखतीत सांगितले.

नरेंद्र मोदी म्हणाले, आज देशाचा एकही कोपरा नाही जिथे आमच्या पक्षाला पाठिंबा मिळत नाही. केरळच्या स्थानिक स्वराज्य संस्थांपासून ते अनेक राज्यातील प्रमुख विरोधी पक्षांपर्यंत आमचा पक्ष लोकांमध्ये जोमाने काम करत आहे. बिहार, पश्चिम बंगाल, ओडिशा आणि झारखंडमध्ये आम्ही प्रमुख विरोधी पक्ष आहोत. बिहारच्या जनतेने आम्हाला खंबीर पाठिंबा आणि जनादेश दिला होता. सहा महिन्यांपूर्वी कर्नाटकात आमचे सरकार होते. आजही पाँडीचेरीत आपले सरकार आहे. सध्या १६ राज्यात आमची सत्ता आहे आणि आठ राज्यात प्रमुख विरोधी पक्ष आहेत, असे नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले.

देशाच्या सर्व भागांतील लोकांच्या पाठिंब्याशिवाय आपण राष्ट्रीय राजकारणात एक महत्त्वपूर्ण शक्ती म्हणून उदयास येऊ शकलो असतो का?, असा प्रश्न नरेंद्र मोदी यांनी उपस्थित केला.

# रायगडात विक्रमी पदवीधर मतदार नोंदणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकण पदवीधर मतदार संघासाठी यंदा विक्रमी मतदार नोंदणी झाली आहे. रायगड जिल्ह्यात २०१९च्या तुलनेत यंदा दुपटीपेक्षा अधिक पदवीधर मतदारांची नोंदणी झाली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी दिली. ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

कोकण पदवीधर मतदारसंघात ३० सप्टेंबरपासून मतदारांची नोंदणी सुरू करण्यात आली होती. ज्या पदवीधरांनी ३० ऑक्टोबर २०२०पूर्वी ज्यांनी पदवी अथवा पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण केली आहे अशा पदवीधरांची या कार्यक्रमांतर्गत नोंदणी करण्यात आली. शासनमान्य पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या मतदारांचे अर्ज भरून घेण्यात आले. या मतदार नोंदणीला रायगडकरांनी उदंड प्रतिसाद दिला आहे.

या वर्षी ४५ हजार ९७३ पदवीधरांनी कोकण पदवीधर मतदारसंघासाठी यंदा नोंदणी केली आहे. २०१९ साली कोकण पदवीधर मतदारसंघासाठी १९ हजार ९१८ मतदारांनी नोंदणी केली होती. म्हणजेच यावर्षी पदवीधर मतदारांची संख्या गेल्या निवडणूकीच्या तुलनेत २५ हजारांनी वाढली आहे. उद्या मतदारसंघाची अंतिम यादी प्रसिध्द होणार आहे.

दरम्यान, या कोकण पदवीधर मतदार संघासाठी जास्तीत जास्त मतदारांची नोंदणी व्हावी यासाठी जिल्हा प्रशासनाने विशेष प्रयत्न केले होते. शाळा, महाविद्यालये, सर्व सरकारी कार्यालये, निमशासकीय अस्थापनामध्ये पदवीधर मतदरांची नोंदणी करून घेण्यात आली. प्रत्येक तहसील कार्यालयाच्या माध्यमातून विशेष मतदार नोंदणी मोहीम राबविण्यात आली. त्यामुळे मतदार नोंदणीत वाढ झाल्याचे या वेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

# मध्य रेल्वेवर उभारण्यात येणार नवे स्थानक

## ठाणे रेल्वे स्टेशनवरील भार होणार हलका

**ठाणे : प्रतिनिधी**

मुंबईची लाइफलाइन असणाऱ्या मध्य रेल्वेच्या प्रवाशांचा प्रवास सुकर व्हावा यासाठी मध्य रेल्वेवर आणखी एक स्थानक उभारण्यात येणार आहे. ठाणे ते मुलुंड यादरम्यान हे स्थानक उभारण्यात आहे. याबाबतच्या कामाला गती मिळाली असून जर काम लववर पूर्ण झाले तर २०२५मध्ये मध्य रेल्वेवर आणखी एक स्थानक कार्यरत होण्याची शक्यता आहे.

मुलुंड आणि ठाण्याच्यामध्ये स्मार्ट सीटीच्या प्रकल्पांतर्गत कोपरी स्थानक उभारण्यात येणार आहे. या स्थानकाला जोडणाऱ्या तीनही उन्नत रस्त्यांचे काम वेगाने सुरू आहे. तसंच, महापालिका आणि रेल्वे प्रशासन यांच्यातील सामंजस्य




कराराची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. ३ मार्च २०२३ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने जमीन हस्तांतरित करण्यात आल्याची परवानगी दिली होती. त्यानंतर ठाणे आणि मुलुंड स्थानकादरम्यान असलेल्या मनोरूग्ण रुग्णालयाच्या प्रस्तावित जागेवर नवे स्थानक उभारण्यात येण्याची घोषणा करण्यात आली. एप्रिलमध्ये रुग्णालयासाठी १४.८३ एकरचा भूखंड राज्य सरकारने महानगरपालिकेला हस्तांतरित केला. ठाणे स्थानकातील गर्दीचा ताण कमी होण्यासाठी नवीन स्थानक उभारण्यात येणार आहे.

ठाणे स्थानकातून जवळपास दररोज सहा लाख रोज प्रवास करतात. स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत या नव्या स्थानकावर १४४.८० कोटी खर्च होण्याची शक्यता आहे. नवीन स्थानकामुळे घोडबंदर येथील नागरिकांचा प्रवास सोपा होणार आहे. डिसेंबरपर्यंत या स्थानकाबाबतचे २२ टक्के काम पूर्ण झाले आहे.

एसएमसी इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीकडे हे काम सोपवण्यात आले आहे. या नवीन स्थानकात तीन प्लॅटफॉर्म बनवण्यात येणार आहे. मुंबई सीएसटी आणि कल्याणच्या दिशेने जाणाऱ्या आणि ठाण्याहून निघणाऱ्या लोकल नव्या स्थानकावरून सोडण्यात येणार आहेत.

## राष्ट्रपिता महात्मा गांधी उद्यानामध्ये स्वच्छता मोहिमेंतर्गत श्रमदान



**पनवेल : प्रतिनिधी**

स्वच्छ भारत अभियानांतर्गत शुक्रवारी (दि. २९) राष्ट्रपिता महात्मा गांधी उद्यानामध्ये महापालिकेचे स्वच्छता कर्मचारी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ महर्षी वाल्मिकी शाखेच्या ज्येष्ठ नागरिक सदस्याकडून स्वच्छता मोहिमेंतर्गत श्रमदान करण्यात आले.

पनवेल महापालिकेच्या वतीने आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ भारत अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविले जातात. समाजातील सर्व घटकांना स्वच्छतेचे महत्त्व कळावे या दृष्टीने शहरातील उद्याने, पर्यटन स्थळे, स्मृतीस्थळे याठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात येत असते.

वर्षाचा शेवट हा चांगल्या कामाने करावा, समाजबांधिलकी या नात्याने समाजोपयोगी काम करून करावा या उद्देशाने, पनवेलमधील राष्ट्रपिता महात्मा गांधी उद्यानामध्ये महापालिकेचा स्वच्छता विभागाचे कर्मचारी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ महर्षी वाल्मिकी शाखेच्या ज्येष्ठ नागरिक सदस्याकडून स्वच्छता मोहिमेंतर्गत श्रमदान करण्यात आले.

नव्या वर्षाचे स्वागत करताना आणि २०२३ वर्षाला निरोप देताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ महर्षी वाल्मिकी शाखेच्या ज्येष्ठ नागरिकांच्या गटाने पनवेलच्या मध्यभागी असलेल्या राष्ट्रपिता महात्मा गांधी उद्यानात अतिशय उत्साहात स्वच्छता मोहिमेंतर्गत श्रमदान केले.

## कर्जत शहरात श्री राम अक्षत मंगलकलश यात्रा उत्साहात



**कर्जत : प्रतिनिधी**

श्री राम जन्मभूमितीर्थ क्षेत्र न्यासचे माध्यमातून मंगलकलश यात्रा शुक्रवारी (दि. २९) कर्जत शहरात आली. कर्जत शहरातून नागरिकांनी मोठ्या जल्लोषात यात्रेत सहभाग घेतला.

हिंदू मनाचा मानबिंदू प्रभू श्रीरामाची अयोध्येत नवीन उभे राहत असलेल्या मंदिरात प्रतिष्ठापना २२ जानेवारी रोजी होत आहे. त्यानिमित्ताने श्री राम अक्षत शुक्रवारी कर्जत तालुक्यात आला. मंगल अक्षत कलशाची शोभायात्रा सायंकाळी कर्जत शहरात काढण्यात आले. तरुणांनी बाईक रॅली काढली. शहरातील चाररस्तापासून भगवे ध्वज लावून दुचाकी पोलीस मैदान येथे पोहचल्या. त्यानंतर असंख्य नागरिकांच्या उपस्थितीत शोभायात्रा काढली.

ही शोभायात्रा श्रीरामाचे जयघोष करीत पोलीस मैदान येथून सुरू झाली. ही यात्रा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक अशी कर्जत नगरपरिषद कार्यालय येथून श्री हनुमान मंदिर पाटील आळी, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा तसेच श्री दत्तमंदिर अशी जुना जकात नाका, महावीर पेठ बाजारपेठ येथून श्री कपालेश्वर देवस्थान येथे पोहचली. त्या ठिकाणी श्री कपालेश्वर मंदिर येथे या मंगलकलशाचे विधिवत पूजन करण्यात आले. नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांनीही मंगल कलश यात्रेत सहभाग घेतला.

## सुट्टीच्या दिवशीही भरणा केंद्रे सुरू

**नवी मुंबई** : नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ताकरधारकांसाठी ३० व ३१ डिसेंबर रोजी सुट्टीच्या दिवशीही महापालिकेच्या सर्व विभाग कार्यालयातील ॲक्सिस बँकेची देयक भरणा केंद्रे तसेच मुख्यालयातील ॲक्सिस आणि आयसीआयसीआय बँकेचे काऊंटर सुरू ठेवण्यात येणार आहे. याशिवाय ऑनलाईन करभरणा सुविधा नागरिकांसाठी उपलब्ध आहे.

नागरिकांनी आपला मालमत्ताकर विहित कालावधीत भरावा व संभाव्य दंड आणि शास्तीची कार्यवाही टाळावी, तसेच मालमत्ताकरातून सेवासुविधा पूर्तता होत असल्याने आपला मालमत्ताकर भरणा करून शहर विकासास हातभार लावावा असे आवाहन करण्यात येत आहे.

## विश्वनिकेतनच्या विद्यार्थी स्मार्ट इंडिया हॅकॉथॉनमध्ये प्रथम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील कुंभिवली गावाच्या हद्दीत विश्वनिकेतन संस्थेचे अभियांत्रिकी महाविद्यालय हे मुंबई विद्यापीठाची संलग्नित असून या महाविद्यालयातील सहा विद्यार्थ्यांची टीम वायरस हंटर्सने राष्ट्रीय पातळीवरच्या अतिशय प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या स्मार्ट इंडिया हॅकॉथॉन या स्पर्धेत सहभाग घेत प्रथम क्रमांक मिळवून महाविद्यालयाची मान गौरवाने उंचावली आहे.

ही राष्ट्रीय स्पर्धा प्रत्येक वर्षी केंद्रीय शिक्षण विभागातर्फे आयोजित करण्यात येते. यावर्षी ही स्पर्धा दुर्ग, छत्तीसगड येथे पार पडली. या स्पर्धेचे उद्घाटन भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी, देशातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्याकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. स्पर्धेत त्या प्रस्तावामधून निवडक २० टीमला सभागासाठी संधी दिली गेली होती.

या स्पर्धेमध्ये विश्वनिकेतन अभियांत्रिकीच्या जयेश थत्ते, ओम सिंग, पायल खूपसे, श्रेया आवटी, राज खांडेकर व पंकज चौरसिया या विद्यार्थ्यांच्या टीमने कॉम्प्युटर सायन्स विभागप्रमुख डॉ. अंकुश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली अथक परिश्रम करीत, स्पर्धेमध्ये दिलेल्या आव्हानात्मक विषयावरचे हार्डवेअर तयार केले होते. या हार्डवेअरने, विविध कठीण परीक्षणामध्ये गुणसंपादन करून, राष्ट्रीय पातळीवर परीक्षकांची वाहवा मिळवत प्रथम क्रमांक मिळवून रोख एक लाख रुपयाचे बक्षीस मिळवले.

विश्वनिकेतन संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. एस. एस. इनामदार, सचिव सुनील बांगर, खजिनदार शिवगुंडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. आर. पाटील, उपप्राचार्य डॉ. एस. बी. कदम, उपप्राचार्या प्राध्यापक शिवानी अग्रवाल यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.




## फुंडे हायस्कूल येथे विभागीय वक्तृत्व स्पर्धा

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

कर्मवीर विद्याप्रबोधिनी रयत शिक्षण संस्था सातारा, अंतर्गत रायगड विभाग कामोठे– पनवेल आयोजित वक्तृत्व स्पर्धा बुधवारी (दि.२७) फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात झाली.



उद्घाटन सोहळ्याला रयत शिक्षण संस्था रायगड विभागाचे विभागीय अधिकारी आर. पी. ठाकूर, सहाय्यक विभागीय अधिकारी एस. एस. फडतरे, स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन कृष्णा कडू, प्राचार्य एम. जी. म्हात्रे, पर्यवेक्षक एस. जी. म्हात्रे, स्कूल कमिटी सदस्य उमेश म्हात्रे, वाशी बँकेचे चेअरमन प्रा. किशोर पाटील, कार्यालय प्रमुख एम. पी. तुमडे यांच्या हस्ते कर्मवीर अण्णा व रयत माऊली लक्ष्मीवहिनी यांचा प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन झाले.

गटनिहाय व माध्यमनिहाय प्रत्येक वर्गात स्पर्धा घेण्यात आली. प्रत्येक गटात प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ असे चार क्रमांक काढण्यात आले, तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आली. परीक्षक सौ. मोरे, एस. एस. फडतरे यांनी निपक्षपातीपणे स्पर्धेचे काम पाहिले. यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख रकमेची पारितोषिके आणि प्रमाणपत्रे देण्यात आली.

रायगड विभागातून एकूण १९८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य सुधीर घरत यांच्या सौजन्याने सर्व स्पर्धकांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. वक्तृत्व स्पर्धा प्रमुख दिगंबर पाटील यांनी स्पर्धेचे नियोजन केले होते. या वेळी वरिष्ठ लेखनिक श्री. गुजर, कनिष्ठ लेखनिक वैभव गावंड उपस्थित होते.

## जासई विद्यालयात विद्यार्थ्यांना मदत

**उरण : वार्ताहर**

शरद पवार इन्स्पायर फेलोशीप इन एज्युकेशन २०२३–२४ यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई प्रतिष्ठानकडून मिळालेली फेलोशिप शशिकला पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी वापरली आहे.

श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनियर कॉलेज दहागाव विभाग जासई विद्यालयाच्या उपशिक्षिका शशिकला चंद्रकांत पाटील यांना इ. आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत बसलेल्या विद्यार्थांना स्वयंअध्ययन करण्याची सवय वाढविण्याच्या उपक्रमांतर्गत मिळालेल्या फेलोशिपमधून विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप अध्यापनात मार्गदर्शन मिळण्यासाठी जासई हायस्कूलमधील इयत्ता आठवी स्कॉलरशिप सन २०२३ – २४ या वर्षीच्या विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या मार्गदर्शिका क्लुप्त्या आणि सूत्रे पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शिका पंढरीनाथ राणे या पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

विद्यालयाचे प्राचार्य आणि 'रयत'चे लाईफ वर्कर अरुण घाग, रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा शेख, गुरुकुल प्रमुख संतोष ठाकरे व शशिकला पाटील, आर. पी. भोईर यांच्या उपस्थितीत वाटप करण्यात आले, तसेच स्कॉलरशिप परीक्षा प्रश्नपत्रिका संचांचे वाटप फेलोशिपमधून करण्यात आले.



# म्हसळ्यात विविध विकासकामांचे भूमिपूजन

**म्हसळा : प्रतिनिधी**

मतदारसंघातील पायाभूत सुविधा निर्माण करीत असताना केवळ रस्ते, पाणीपुरवठा किंवा समाज सभागृह उभारणे एवढ्यापुरते मर्यादित न ठेवता प्रत्येक नागरिकाला स्वावलंबी होण्यासाठी पर्यटन, उद्योग, आर्थिक विकासावर आधारीत राहील. जेणेकरून गावांतील चाकरमानी स्थलांतरीत न होता तो आपल्या गावातच वास्तव्यास राहतील अशी रोजगाराची दालन खुले करण्याचा मानस खासदार सुनील तटकरे यांनी बोलून दाखविला.

म्हसळा पाचगाव आगरी समाज सभामंडपाचे उद्घाटन आणि साळविंडे–तोंडसुरे रस्ता बांधकाम भूमिपूजन खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

खारगाव खुर्द, सकलप, तोंडसुरे, बनोटी, रेवळी (गणेशनगर)आणि खारगाव बुद्रुक या गावांसाठी सामाजिक सभागृहाचे समोरील नूतन सभामंडप बांधकामास खासदार सुनील तटकरे यांनी त्यांचे विकास निधीतून १० लक्ष रूपये खर्च करून भव्य सभमंडपाचे उद्घाटन आणि ६.५ कोटी रुपये मंजूर खर्चाचे सालविंडे, तोंडसूरे, जंगमवाडी, वरवठणे गाव जोडरस्त्याचे भूमिपूजन करण्यात आले.

या वेळी राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष समीर बनकर, जिल्हा चिटणीस महादेव पाटील, माजी जिल्हा सभापती बबन मनवे, माजी सभापती नाझीम हसवारे, नगराध्यक्ष संजय कर्णिक, युवक अध्यक्ष फैसल गीते, रफिक घरटकर, सुहेब हलदे, अनिल बसवत, शाहीद उकये, समाज अध्यक्ष भालचंद्र गाणेकर, सचिव गणेश नाक्ती, सरपंच अनंत नाक्ती, सरपंच देवजी गाणेकर, सरपंच वनिता खोत, मनोज नाक्ती, सरपंच कोमल वेटकोळी, सरपंच सुरेश महाडीक, प्रकाश गाणेकर, लहूशेट म्हात्रे, गजानन पाखड, शेखर खोत, इरफान पेवेकर, मधुकर गायकर, संदीप चाचले, संतोष सावंत, महेश घोले, माजी सभापती छाया म्हात्रे, महिला अध्यक्षा मिना टिंगरे, जिल्हा चिटणीस सोनल घोले, रेश्मा कानसे, शहर महिला अध्यक्षा शगुप्ता जहांगीर, तहसीलदार समिर घारे, गटविकास अधिकारी बाळासाहेब भोगे, बांधकाम सहाय्यक अभियंता शेटचे आदी अधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक समाज अध्यक्ष भालचंद्र गाणेकर, सूत्रसंचलन सचिव गणेश नाक्ती तर आभार विश्वास खोत यांनी मानले.

पान १ वरुन

## उरणमध्ये विकसित भारत संकल्प यात्रेचा शुभारंभ

या वेळी आमदार महेश बालदी, उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, तालुका महिला अध्यक्ष राणीताई म्हात्रे, रायगड जिल्हा उपाध्यक्ष नीलकंठ घरत, जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत, तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, करण ठाकूर, धनेश गावंड, देवेंद्र पाटील, आवरे सरपंच मीराबाई पाटील, हरिश्चंद्र गावंड, आवरे ग्रामपंचायत सदस्य अविनाश गावंड, आवरे गाव भाजप अध्यक्ष बाळा गावंड, सरपंच, उपसरपंच, सदस्य अंगणवाडी, तलाठी, कोतवाल आदी भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

***सर्व सामान्यांपासून ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नात असलेला भारत घडवू या, विकसित भारत संकल्प यात्रा आपण यशस्वी करूया व स्वागत करूया व जनतेच्या आशेचा एक किरण बनवूया.***

***–आमदार महेश बालदी***

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते आज 'अयोध्या धाम'चे उद्घाटन

पंतप्रधान दुपारी १ वाजता एका सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमात ते राज्यातील १५ हजार ७०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करतील. यात अयोध्या आणि त्याच्या आसपासच्या परिसराच्या विकासासाठी सुमारे ११,१०० कोटी रुपयांचे प्रकल्प आणि उत्तर प्रदेशातील इतर प्रकल्पांशी संबंधित सुमारे ४,६०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचा समावेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या अयोध्या दौऱ्यात दोन अमृत भारत आणि सहा वंदे भारत रेल्वेंना हिरवा झेंडा दाखवणार आहेत.

## रिक्षात विसरलेला लॅपटॉप पोलिसांच्या सतर्कतेमुळे परत

**पनवेल : वार्ताहर**

रिक्षात विसरलेला महागडा लॅपटॉप पनवेल शहर पोलिसांच्या सतर्कतेमुळे महिलेला परत मिळाला आहे.

परराज्यातून आलेल्या योगिता नागतिलक या एका मोठ्या कंपनीमध्ये कामाला असून त्या पनवेल परिसरात काही कामानिमित्त आल्या होत्या. रिक्षातून प्रवास करीत असताना त्यांचा महत्त्वाचा असा कामाचा लॅपटॉप त्या रिक्षात विसरून गेल्या होत्या. यासंदर्भात त्यांनी तातडीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात माहिती दिली.

यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अभयसिह शिंदे, पोलीस शिपाई नितीन कांबळे, साईनाथ मोकल आदींच्या पथकाने यांनी प्रवास केलेल्या रिक्षाची माहिती तांत्रिक तपासाच्या आधारे व सीसीटीव्ही फुटेजद्वारे काढली. रिक्षाचालकाशी पोलिसांनी तातडीने संपर्क साधून रिक्षात विसरलेला लॅपटॉप त्यांनी ताब्यात घेऊन महिलेला परत दिल्याने त्यांनी पनवेल शहर पोलिसांचे आभार मानले आहे.



## संपादकीय

# राजकीय युद्धाचे वर्ष

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी अवघे दोन दिवस उरले आहेत. मावळत्या वर्षाने आपल्याला नेमके काय दिले याचा हिशेब घेण्याचे हे दिवस. तथापि, मावळत्या वर्षाचा हिशेब करण्यापेक्षाही अधिक महत्त्वाची आहे ती येत्या वर्षातील सार्वत्रिक निवडणुकांची सज्जता.

**लोकसभेच्या निवडणुका येत्या काही महिन्यांतच जाहीर होतील. पाठोपाठ विधानसभेसाठीही रणांगण गजबजू लागेल. मुंबई महापालिकेसह अनेक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाही झालेल्या नाहीत. त्यांचाही कौल घ्यावाच लागेल. सर्वोच्च न्यायालयाने येत्या वर्षात सप्टेंबर अखेरीपर्यंत जम्मू आणि काश्मीर येथे देखील निवडणुका घेण्यात याव्यात असा आदेश केंद्र सरकारला दिला आहे. थोडक्यात सांगायचे तर संपूर्ण देशभरात पुढील वर्षी राजकीय धमासान होणार आहे. त्याचे पडघम आतापासूनच वाजू लागले आहेत. यंदा प्रथमच काँग्रेसने महाराष्ट्रातील नागपूरमध्ये प्रचाराचे रणशिंग फुंकले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय नागपुरात आहे हे सर्वश्रुत आहे. शिवाय, हे महानगर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निवडलेली दीक्षाभूमी म्हणून लौकिकप्राप्त आहे. गेले काही महिने काँग्रेसचे खासदार राहुल गांधी सातत्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला टीकेचे लक्ष्य करत आहेत. अर्थात, काँग्रेसने संघावर टीका करणे हे काही नवीन नाही. सुरूवातीपासूनच काँग्रेसचे ते धोरण राहिले आहे. संघविचाराला जमेल तितका प्रखर विरोध सर्व पातळ्यांवर करत काँग्रेसने या देशावर साठ वर्षे राज्य केले, परंतु आता बाजी पलटली आहे. २०१४ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रूपाने काँग्रेस विचारसरणीला आस्मान दाखवणाऱ्या नेतृत्वाचा उदय झाला. मोदी सरकारच्या नऊ वर्षांच्या कारभाराकडे कटाक्ष टाकला तरी हेच दिसून येते की संघाची विचारधारा पंतप्रधान मोदी आणि त्यांचे सहकारी यशस्वीरित्या पुढे नेत आहेत. जम्मू-काश्मीरमधून ३७० कलम हटविण्याचा मुद्दा असो किंवा अयोध्येतील राममंदिराचा विषय असो. संघाच्या मुशीतून तयार झालेल्या भारतीय जनता पक्षाच्या अजेंड्यावरील हे मुद्दे होते व आहेत. जे स्वप्न संघसंस्थापकांनी आणि त्यानंतर थोर नेते अटलबिहारी वाजपेयी यांनी पाहिले, तेच स्वप्न पंतप्रधान मोदी साकार करत आहेत. मोदी यांच्या विजयामध्येच काँग्रेसचा पराभव सामावलेला आहे हे ध्यानात घ्यायला हवे. ही विचारधारेची लढाई आहे. यंदा प्रथमच काँग्रेसने विचारधारेचा उपयोग निवडणुकीतील अस्त्र म्हणून करावयाचे ठरवलेले दिसते. म्हणूनच या पक्षाने नागपूरची भूमी प्रचाराची नांदी करण्यासाठी निवडली असावी. काँग्रेसच्या नागपूर येथे गुरूवारी झालेल्या सभेला गर्दी चांगली जमा करण्यात आली होती, परंतु नेहमीप्रमाणे नेत्यांची भाषणे रटाळ झाली. काँग्रेसच्या १३८व्या वर्धापन दिन सोहळ्यात बोलताना अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी दलित कार्ड वापरले. पंतप्रधान मोदी हे संघ परिवाराचा अजेंडा पुढे रेटत आहेत आणि या अजेंड्यात दलितांना काहीच स्थान नाही असे विचित्र तर्कट त्यांनी आपल्या भाषणात मांडले. मोदी यांच्यावर ऊठसूट वेडीवाकडी टीका करणाऱ्या राहुल गांधी यांनी नेहमीचीच टेप वाजवली. यामुळे मोदी यांचा विजयरथ रोखता येईल असे मात्र नव्हे. किंबहुना, संघ विचाराला पराभूत करण्याची ताकद काँग्रेस विचारसरणीने कधीच गमावली आहे. मोदी यांना जमेल तसा विरोध करत राहणे या पलीकडे कुठलाही अजेंडा विरोधकांकडे उरलेला नाही हेच खरे. मोठ्या लढाईसाठी काँग्रेसला सारे बळ एकवटून मोदी यांच्या करिश्म्याचा सामना करावा लागणार आहे. कारण मोदी हीच आता देशाची विचारसरणी बनून गेलेली आहे.**

# भारतीय कवी, नाटककार मंगेश पाडगावकर

मंगेश पाडगावकर यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून... पाडगावकर यांचा जन्म १० मार्च १९२९ रोजी वेंगुर्ले येथे झाला. मराठी आणि संस्कृत विषय घेऊन 'एम.ए' झालेल्या पाडगावकर यांनी दोन वर्षे महाविद्यालयात अध्यापक म्हणूनही काम केले. १९५३ ते १९५५ ही दोन वर्षे पाडगावकर यांनी 'साधना' साप्ताहिकात सहसंपादक म्हणून काम केले. मुंबई आकाशवाणीवर १९६४ ते १९७० या कालावधीत निर्माता म्हणूनही त्यांनी काम केले.

६० आणि ७०च्या दशकात पाडगावकर, 'ज्ञानपीठ' विजेते कवी विंदा करंदीकर आणि कवी वसंत बापट यांचे एकत्रित काव्यवाचनाचे कार्यक्रम राज्यात अनेक ठिकाणी झाले. पाडगावकर यांनी लिहिलेली 'या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे', 'भातुकलीच्या खेळामधली', 'शुक्रतारा मंद वारा' ही गाणीही खूप गाजली. प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आमचं अगदी 'सेम' असतं, ही त्यांची कविताही विशेष गाजली होती.

दुबईमध्ये झालेल्या दुसऱ्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे पाडगावकर अध्यक्ष होते. उतारवयातही त्यांनी अनेक कार्यक्रमांमधून आपल्या कविता सादर करून रसिकांचे मन जिंकले. २०१३मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. २००८ मध्ये त्यांना राज्यातील प्रतिष्ठेचा महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १९८० मध्ये त्यांच्या सलाम या कविता संग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला होता. 'धारानृत्य'हा पाडगावकर यांचा पहिला काव्यसंग्रह



१९५०मध्ये प्रकाशित झाला. सुरुवातीच्या काळात पाडगावकर यांच्या कवितेवर ज्येष्ठ कवीवर्य बा. भ. बोरकर यांचा ठसा होता. नंतर त्यांनी भावकाव्य शैलीत आणि स्वतंत्रपणे काव्यलेखन सुरू केले.

'जिप्सी' (१९५२), 'छोरी' (१९५४), 'उत्सव' (१९६२), 'विदुषक' (१९६६), 'सलाम' (१९७८), 'गझल' (१९८३), 'भटके पक्षी' (१९८४), 'बोलगाणी' (१९९०) हे पाडगावकर यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. पाडगावकर यांनी 'गझल', 'विदुषक', 'सलाम' या काव्यसंग्रहातून राजकीय आशयाची व उपरोधिकपणा असलेली समाजातील विसंगतीवर प्रहार करणारी कविता केली. सत्तेच्या संपर्कात राहणाऱ्या वर्गातील लोकांनी सांस्कृतिक व साहित्यिक क्षेत्रातील माणसांचा केलेला मानभंग, मध्यमवर्गीयांमध्ये आलेली लाचारी, दांभिकता याबद्दल पाडगावकर यांच्या मनात संताप होता तो या कवितांमधून प्रभावीपणे व्यक्त झाला. १९६० नंतरच्या वास्तवावर भेदकपणे प्रकाश टाकणारी पाडगावकर यांची कविता नवसमृद्ध वर्गाची, त्याच्या संवेदनाहीन मनाची चिरफाड करून वाचकांना अंतर्मुख करते. पाडगावकरांची कविता सादर करण्याची एक विशेष ढब होती. त्या ऐकताना श्रोते जसे खळखळून हसत तसेच मंत्रमुग्धही होत असत. शाळा कॉलेजांमधील पाठ्यपुस्तकांमध्येही पाडगावकरांच्या कविता होत्या.

'बोलगाणी' हा पाडगावकर यांनी काव्यरचनेवर केलेला एक वेगळा प्रयोग आहे. मीरा, कबीर आणि तुलसीदास यांच्या कवितांचे भावानुवादही पाडगावकर यांनी अत्यंत प्रभावीपणे केले होते. पाडगावकर यांचे 'भोलानाथ, 'बबलगम', 'चांदोमामा' हे बालकविता संग्रह प्रसिद्ध आहेत. १९६४ मध्ये प्रकाशित झालेला 'वात्रटिका'हा त्यांचा कवितासंग्रह पाडगावकर यांची एक वेगळी ओळख करून देणारा ठरला आहे. पाडगावकर यांनी 'बायबल'ग्रंथाचा मराठी अनुवाद केला होता. अशा या थोर कवीचे ३० डिसेंबर २०१५ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

# भिंतीवरील कॅलेंडर सोबत स्वत:लाही बदला...

बघता बघता २०२३ वर्ष संपत आले आहे. आता वर्ष बदलत आहे. तेव्हा या वर्षाला निरोप देत, येणाऱ्या नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी आपण सर्व उत्सुक आहोत. नवीन वर्षामध्ये अनेक गोष्टी कळत-नकळतपणे बदलणार आहेत. नव्याने काही गोष्टी आपल्या घरी येणार आहते. त्यातील एक म्हणजे आपल्या घरातील भिंतीवरचे कॅलेंडर. आज आपल्या प्रत्येकाकडे मोबाईल असला तरीही आपण नविन वर्ष सुरू झाल्याबरोबर न चुकता भिंतीवरचे कॅलेंडर बदलत असतो. आपल्या घरातील भिंतीवर लटकलेले कॅलेंडर दरवर्षी नवीन असते पण खिळा मात्र वर्षानुवर्षे तोच असतो. हा खिळा एकाच ठिकाणी वर्षानुवर्षे राहत असल्याने एक दिवस तो गंजतो आणि त्याचे तिथले अस्तित्व संपून जाते. आपल्या आयुष्याच्या बाबतीत सुद्धा बऱ्याचदा असच काही घडत असते.

अनेकदा आपल्याकडे वेळ असताना आपण स्वतःमध्ये आवश्यक असलेला बदल करून घेत नाही. आयुष्यात ज्या चुका आपण पूर्वी केलेल्या असतात, त्याच चुका पुन्हा पुन्हा आपण करत राहतो. त्यामुळे बऱ्याचदा त्याचे परिणाम आपल्याला जन्मभर भोगावे लागत असतात. कारण आपल्या छोट्या - छोट्या चुका कधी मोठ्या होऊन जातात याचा पत्ता सुद्धा बऱ्याचदा आपल्याला लागत नाही आणि एकदा हातातून सुधरण्याची वेळ निघून गेली कि, सावरणे कठीण होऊन जाते. त्यामुळे हळूहळू आपल्या सुंदर अशा आयुष्याला खिळ्यासारखा गंज चढत जातो आणि गंज चढलेल्या गोष्टी अधिक काळ टिकून राहत नसतात हेही तितकेच खरे. तेव्हा चुकून आपल्या आयुष्याच्या खिळ्याला एकदा गंज चढला कि, आपले अस्तित्व संपले समजायचे. त्यामुळे स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवायचे असेल तर येणाऱ्या नवीन वर्षात भिंतीवरील कॅलेंडर सोबत आधी स्वतःमध्ये बदल घडविला पाहिजे.





आयुष्याच्या प्रवासामध्ये एकामागून एक दिवस कसे जातात कळत नाही. या प्रवासात अनेक गोष्टी जलद गतीने बदलतात. कधी मनासारखं तर कधी मनाविरुद्ध घडत जाते. जसे न सांगता आयुष्यामध्ये नकळत काही माणसे येतात, तसेच न सांगता काही माणसे जातात. काही थांबतात, काही पुढे जातात, काही सोडून जातात तर काही शिकवून जातात. कधी वाईट तर कधी चांगले, कधी बरे तर कधी खरे, कधी छोटे तर कधी मोठे प्रसंग आयुष्यामध्ये येत राहतात, जात राहतात. आयुष्यामध्ये आलेले असे कितीतरी प्रसंग असतात जे आपल्याला वेळोवेळी अनेक गोष्टी शिकवत असतात. पण बऱ्याचदा आपण त्याकडे दुर्लक्ष करत असतो. एवढच कशाला तर अनकेदा आपण त्यातून काही नवीन शिकण्याचा साधा प्रयत्न सुद्धा करत नाही. त्यामुळे आपली परिस्थिती आणि आपल्या तक्रारी जन्मभर काहीही केले तरीही काही संपत नाही.

आयुष्यामध्ये आलेली कोणतीही वेळ आपल्यासाठी कधीही थांबत नसते. जसे हे वर्ष गेले अगदी तसेच पुढील वर्ष सुद्धा बघता-बघता निघून जाईल. त्यामुळे नंतर करू? वाट बघू? या भ्रमात राहू नका. जेवढ्या लवकर आपण आपल्यामध्ये बदल करून घेऊ तेवढ्याच लवकर आपण शारीरिकदृष्ट्या आणि मानसिकदृष्ट्या मजबूत होऊ. त्यामुळे गेल्या वर्षभरामध्ये ज्या गोष्टी आपल्या मनाविरुद्ध घडल्या असतील किंवा ज्यांच्यामुळे मनाविरुद्ध घडले असेल त्यांना सरसकट बदलवून टाकावे. कारण आजच्या काळात भावनिक होण्यापेक्षा प्रॅक्टिकल होणे गरजेचे आहे आणि शेवटी एकच सांगणं आहे की, माणसे गमवायला घाबरु नका. कारण रिकाम्या जागा लवकर भरल्या जातात.

आपण बदलणार तरच आपल्या व्यक्तीमत्वात बदल घडणार आहे. कारण आयुष्यात जी माणसे बदलतात तिचं माणसे उंच भरारी घेत असतात आणि वेळेसोबत जी माणसे बदलत नाही ती माणसे तिथेच आयुष्यभर गंजत राहतात. मग आता आपणच ठरवायचं आपल्याला गंजायचे आहे की चमकायचे आहे?

**-सुरज पी दहागावकर, चंद्रपूर**






## गुगल वॉलेटद्वारे ऑनलाईन पेमेंटसाठी इंटरनेटची गरज नाही




कोरोना आणि नोटाबंदीनंतर देशात ऑनलाइन पेमेंटचा ट्रेंड झपाट्याने वाढला आहे. ऑनलाइन पेमेंटला प्रोत्साहन देण्यात ४जी आणि ५जी तंत्रज्ञानाचाही मोठा वाटा आहे. त्यामुळेच वापरकर्ते त्यांच्या वॉलेटमधून किंवा खात्यातून लाखो रुपयांचे व्यवहार इंटरनेटच्या मदतीने झटपट करू शकतात, पण आता जर तुम्हाला सांगितले गेले की आता ऑनलाईन पेमेंटसाठी इंटरनेटची आवश्यकता नाही आणि तुम्ही इंटरनेटशिवाय आर्थिक व्यवहार करू शकाल. तुम्हाला कदाचित हा एखादा जोक वाटेल, पण आता इंटरनेटची गरज भासणार नाही हे अगदी खरे आहे. यासाठी गुगल वॉलेटने एक नवीन सुविधा सुरू केली आहे, ज्याबद्दल जाणून घेऊया.

गुगलने नुकतीच कॉन्टॅक्टलेस पेमेंट सिस्टीम सादर केली आहे, ज्यामध्ये गुगल वॉलेट व्हर्च्युअल कार्ड पेमेंटशी जोडले जाईल. या तंत्रज्ञानाच्या मदतीने, तुम्हाला गुगल वॉलेटद्वारे पेमेंट करण्यासाठी इंटरनेट कनेक्शनची आवश्यकता नसेल. तुमचे कार्ड वॉलेटशी जोडण्यासाठी तुम्हाला एकदा सुरूवातीला इंटरनेटची आवश्यकता असेल, पण त्यानंतर तुम्ही एका साध्या टॅपवर ऑनलाईन पेमेंट करू शकाल.

कॉन्टॅक्टलेस पेमेंट सिस्टीममध्ये तुम्ही तुमचे गुगल वॉलेट उघडताच तुम्हाला डीफॉल्ट व्हर्च्युअल कार्ड दिसेल. तुम्ही त्यावर टॅप करताच कार्डचे तपशील रीडरच्या मदतीने एनएफसी सिग्नल रीडरपर्यंत पोहचतील आणि तुम्हाला जे पेमेंट करायचे आहे ते पूर्ण होईल. या तंत्रज्ञानाद्वारे तुम्ही ऑफलाइन मोडमध्ये देखील पेमेंट करू शकता.

कॉन्टॅक्टलेस पेमेंट सिस्टीममध्ये जर तुम्ही बराच काळ ऑफलाइन असाल, तर तुम्हाला पेमेंट करण्यात अडचणी येऊ शकतात. म्हणून जेव्हा तुम्ही पेमेंट करता तेव्हा तुमचे इंटरनेट किती काळ सक्रिय होते याची नक्की खात्री करून घ्या, असा सल्ला देण्यात आला आहे. त्यामुळे त्यावर लक्ष ठेवा.

# भारतीय अंतराळ कार्यक्रमाचे जनक विक्रम साराभाई

डॉ. विक्रम अंबालाल साराभाई हे एक प्रसिद्ध भारतीय भौतिकशास्त्रज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ होते. १२ ऑगस्ट १९१९ रोजी जन्मलेले विक्रम साराभाई यांनी भारतीय अंतराळ कार्यक्रमाला जन्म दिला. त्यांचा जन्म अहमदाबाद येथे झाला होता. त्यांचे वडील अंबालाल साराभाई आणि आई सरलादेवी होत्या. त्यांचे वडील खूप मोठे व्यापारी होते.

भारतीय अंतराळ कार्यक्रमाचे जनक म्हणून यांनी देशाला अंतरिक्षमध्ये पोहचण्यात खूप मदत केली आणि देशात परमाणू शक्ती विकसित करण्यामध्येदेखील आपले योगदान दिले. डॉ.विक्रम साराभाई यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळुरू येथे भौतिकशास्त्रज्ञ चंद्रशेखर वेंकट रमण यांच्या मार्गदर्शनात कॉस्मिक रेज यावर शोध केले. त्यांनी आपला पहिला संशोधन लेख टाईम डिस्ट्रिब्युशन ऑफ कॉस्मिक रेज प्रोसिडिंग ऑफ द इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सेसमध्ये प्रकाशित केला. साराभाई यांनी १९४०-४५ या कालावधीत वैश्विक किरणांवरील संशोधन कार्यामध्ये बंगळुरू येथील गीगर-मुलर काउंटर आणि काश्मीर-हिमालयातील उच्चस्तरीय केंद्रावरील वैश्विक किरणांच्या काळातील फरकांचा अभ्यास केला.



### निमित्त

१९६६मध्ये भौतिकशास्त्रज्ञ डॉ. होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर डॉ. विक्रम साराभाई यांना भारतीय अणुऊर्जा आयोगचे अध्यक्ष बनवले गेले. भारतीय अंतरिक्ष अनुसंधान संस्था (इस्रो)ची स्थापना यांनी केलेल्या अनेक महत्त्वाच्या कार्यांपैकी सर्वांत मोठी उपलब्धी आहे. रशियन उपग्रह 'स्पुतनिक'च्या प्रक्षेपणानंतर भारतासारख्या विकासशील देशासाठी अंतराळ कार्यक्रमाचे महत्वाबद्दल त्यांनी सरकारला कळवली. डॉ. विक्रम साराभाई हे अंतराळ कार्यक्रमाच्या महत्त्वावर जोर देऊन म्हणाले, राष्ट्राचा विकास हा तेथील लोकांच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या आकलनाशी आणि वापराशी घनिष्ठपणे जोडलेला आहे.

डॉ. साराभाई यांच्या नेतृत्वाखाली पहिल्या भारतीय उपग्रह 'आर्यभट्ट'चे निर्माण कार्य सुरु झाले आणि १९७५मध्ये रशियन उपग्रह प्रक्षेपण वाहनाच्या मदतीने प्रक्षेपित केले गेले. याप्रमाणे भारताच्या अंतराळ कार्यक्रमाची सुरुवात झाली.

डॉ. विक्रम साराभाई यांचा विवाह सुप्रसिद्ध शास्त्रीय नृत्यांगना मृणालिनी स्वामिनाथन यांच्यासोबत झाला होता. या दोघांनी कलाचे प्रचार आणि शिक्षणासाठी १९४९मध्ये 'दर्पण अकादमी ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स'ची स्थापना केली. त्यांनी भारताचे फार्मास्युटिकल उद्योगातदेखील महत्त्वाचे योगदान दिले. हे फार्मास्युटिकल उद्योगात इलेक्ट्रॉनिक डेटा प्रोसेसिंग आणि ऑपरेशन्स रिसर्च तंत्र लागू करणारे पहिले व्यक्ती होते. त्यांच्या सतत प्रयत्नांमुळे भारत औषध उद्योगात स्वावलंबी बनले. भारतीय प्रबंधक संस्थान, अहमदाबादची स्थापना करण्यामध्येदेखील त्यांनी सहकार्य दिले.

१९६२मध्ये डॉ. विक्रम साराभाई यांना शांतीस्वरूप भटनागर मेडल देण्यात आला. १९६६मध्ये पद्मभूषण आणि १९७२मध्ये पद्मविभूषण दिला गेला. ३० डिसेंबर १९७१ रोजी त्यांचे निधन झाले.

तिरुअनंतपुरम येथील थुंबा इक्वेटोरियल रॉकेट लॉन्चिंग स्टेशन आणि संबंधित अवकाश संस्थांचे नामकरण महान शास्त्रज्ञाच्या सन्मानार्थ विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे करण्यात आले. हे भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे प्रमुख अंतराळ संशोधन केंद्र म्हणून उदयास आले आहे. १९७४मध्ये सिडनीस्थित इंटरनॅशनल अ‍ॅस्ट्रॉनॉमिकल युनियनने ठरवले की 'सी ऑफ सेरेनिटी'वरील बेसाल्ट मून क्रेटर आता साराभाई विवर म्हणून ओळखले जाईल. १९७२मध्ये त्यांच्या मृत्यूच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त भारतीय टपाल विभागाने एक टपाल तिकीट जारी केले होते.

**(साभार : वेबदुनिया)**

### क्लिक...क्लिक...!



पनवेल : शहरालगतच्या वडघर पुलाखाली मोकळ्या जागेवर जवळा वाळण्यासाठी ठेवण्यात आला आहे.

## आरोग्य प्रहर

## तरुणाईच्या आहारात हवे 'हे' पदार्थ



निरोगी आणि उत्तम आयुष्य जगण्यासाठी व्यायाम आणि आहाराकडे विशेष लक्ष द्यायला हवे. मुख्य म्हणजे तिशीनंतर खांद्यावर खूप मोठी जबाबदारी असते. या काळात लग्न, पालकत्व, नोकरी आणि घरातील कामात आपण इतके व्यग्र होतो की, स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. या सगळ्या गोष्टी करण्यासाठी आपल्या शरीराला उर्जा तर लागतेच, शिवाय शरीर सुदृढ हेल्दी राहणंदेखील गरजेचं आहे. तिशीनंतर गंभीर आजारांचा धोका वाढतो.

मधुमेह, बीपी, थायरॉईड, थकवा, अशक्तपणा, लठ्ठपणा, हृदयविकार इत्यादी आजारांना आपण बळी पडतो. गंभीर आजार आपल्याला होऊ नये, असे वाटत असेल तर, आहारात काही हेल्दी पदार्थांचा समावेश करा.

या संदर्भातील माहिती देताना पोषणतज्ज्ञ शिखा अग्रवाल सांगतात, असे अनेक शाकाहारी पदार्थ आहेत, ज्यांच्या सेवनाने शरीराला लोह, कॅल्शियम, प्रथिने यांसारखे सर्व पोषक घटक मिळू शकतात. जर आपण तिशीत पदार्थ करत असाल तर, या पदार्थांचा आजपासून सेवन करण्यास सुरुवात करा. पालक, केळी आणि हिरव्या पालेभाज्यांमध्ये भरपूर जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट असतात. जे हाडांच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरतात. शिवाय ऋतूतील व्हायरल इन्फेक्शनपासून सरंक्षण करतात.

उत्तम आरोग्य राखण्यासाठी तज्ज्ञ सुकामेवा खाण्याचा सल्ला देत असतात. सुकामेवा खाल्ल्याने त्यातून शरीराला ओमेगा-३ फॅटी ॲसिडस्, फायबर आणि प्रथिने मिळतात, जे हृदय आणि मेंदूच्या आरोग्य उत्तम राखण्यासाठी मदत करतात.

सिमला मिरची, गाजर, ब्रोकोली आणि टोमॅटोमध्ये भरपूर प्रमाणात अँटिऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वे असतात, जी रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. यासह त्यातील ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस कमी करतात. बेरी, लिंबूवर्गीय फळे, सफरचंद आणि केळी विविध जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्स प्रदान करतात, ज्यामुळे आरोग्य सुदृढ राहते.

# पक्षाने दिलेली जबाबदारी आनंदाने पार पाडणार

## माजी आमदार सुरेश लाड यांनी दिली ग्वाही

**कर्जत : प्रतिनिधी**

४५ वर्षे मी काँग्रेस विचार धारेची कास धरली. पक्ष संघटना वाढवली. ज्या वेळी विद्यमान आमदारांनी मी १५ वर्षे आमदार असताना किती कामे केली? असा प्रश्न विचारला. त्या वेळी प्रमुख पदाधिकारी किंवा कार्यकर्त्यांनी एकही शब्द काढला नाही. त्या वेळी मनाला खूप वेदना झाल्या. त्याच वेळी मी समजलो मला एकाकी पडण्याचा प्रयत्न झाला. पक्षनेतृत्वानेही हवी तशी साथ मला दिली नाही. त्यामुळे मी भारतीय जनता पक्षात जाण्याचा विचार केला. त्या पक्षात जाताना मी कोणत्याही प्रकारच्या अटी घातल्या नाहीत कारण मी काही



इतका मोठा नाही. आगामी निवडणुकीत पक्ष ठरवेल त्याचे काम मी करणार आहे, असे प्रतिपादन माजी आमदार सुरेश लाड यांनी केले.

माजी आमदार सुरेश लाड यांनी काही दिवसांपूर्वीच मोजक्याच कार्यकर्त्यांच्या समवेत नागपूर येथे जाऊन भाजपमध्ये प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी प्रथमच पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. या वेळी माजी सभापती तानाजी चव्हाण आणि माजी नगराध्यक्ष शरद लाड उपस्थित होते.

सुरेश लाड पुढे म्हणाले, गेल्या दोन वर्षांपासून मी राजकारणापासून अलिप्त होतो. मध्यंतरीच्या काळात राष्ट्रवादी काँग्रेसचे विभाजन झाले. तालुक्यातील बहुतांश कार्यकर्ते अजित पवारांच्या गटात गेले. बरोबर असलेल्या विश्वासू कार्यकर्त्यांना न्याय मिळावा म्हणून मी भाजपमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. आम्ही वेगवेगळ्या राजकीय पक्षात असताना एकमेकांविरुद्ध बोलले असेल, मात्र आता आम्ही महायुतीत असल्याने जे धोरण युतीचे असेल ते मी स्वीकारणार आहे. पक्ष आदेश देईल ते काम करू. आपण पक्षाच्या आदेशाप्रमाणे आणि पक्ष महायुतीमधील उमेदवार निश्चित करेल त्यांचा निष्ठेने प्रचार कार्य करून निवडून आणण्यासाठी प्रयत्न करू. येत्या १ जानेवारी रोजी काही कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश आहे. त्यामध्ये कुणी मोठे पदाधिकारी किंवा नेते नाहीत. बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश होणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

# बैलगाडी शर्यतीने मुरूड पर्यटन महोत्सवाची सुरुवात

**मुरुड : प्रतिनिधी**

महेंद्र दळवी सामाजिक फाउंडेशन व नगरपालिकेच्या वतीने आयोजित मुरुड जंजिरा पर्यटन महोत्सवाची सुरुवात शुक्रवारी (दि. २९) बैलगाडी स्पर्धेने करण्यात आली. हजारोंच्या संख्येने पर्यटक व स्थानिक समुद्र किनारी जमले होते. ग्रामीण शहरी भागातील लोकांनी बैलगाडी स्पर्धा पाहण्यासाठी तुफान गर्दी केली होती. बैलगाडी स्पर्धे चे हौशी लोकांसाठी विशेष आयोजन करण्यात आले होते.

आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून बैलगाडी स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी शिवसेनेचे रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रकाश देसाई, जिल्हाध्यक्ष राजा केणी, माजी सरपंच भाई सुर्वे, जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे, शहर प्रमुख संदीप पाटील, निलेश घाटवळ, सागर चौलकर, सुबुक दर्जी, पर्यटन महोत्सवाचे उपकार्याध्यक्ष वीरेंद्र भगत, प्रकाश सरपाटील, माजी गिरीश साळी, जिल्हा संघटिका शुभांगी करडे आदी उपस्थित होते.

सकाळी फूड फेस्टिवलचेही उद्घाटन करण्यात आले. किनारी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल लावण्यात आले आहेत. येणाऱ्या



छाया : सुधीर नाझरे

पर्यटकांना कोकणी खाद्यपदार्थ या ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. या फूड फेस्टिवलचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष व पर्यटन महोत्सवाच्या अध्यक्ष कल्पना पाटील यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. या वेळी माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील, माजी नगरसेविका युगा ठाकूर, पद्मदुर्ग व्यावसायिक संघटनेचे अध्यक्ष अरविंद गायकर, माजी नगरसेविका मेघाली पाटील, नैनिता कर्णिक आदी उपस्थित होते.



# आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील सध्या रिक्त असलेल्या आपले सरकार सेवा केंद्रांची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या https://raigad.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. रिक्त असलेल्या सर्व आपले सरकार सेवा केंद्रासाठी इच्छुक नागरिकांनी https://raigad.gov.in या संकेतस्थळावरून अर्जाचा नमुना डाऊनलोड करून सदरचे अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह ३० जानेवारी २०२४ रोजी नोंदणी शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड येथे सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्यात सध्या कार्यरत असलेली सर्व महा ई सेवा केंद्रे, सेतु सुविधा केंद्रे, नागरी सुविधा केंद्रे तसेच संग्राम केंद्रे यांना आपले सरकार सेवा केंद्र हे नाव देऊन सर्व कॉमन सर्व्हिस सेंटरचे एकसारखे ब्रँडिंग करण्यात आले आहे.

प्रत्येक ग्रामपंचायत व नगरपंचायत क्षेत्रात किमान एक केंद्र स्थापन करण्यात येईल, मात्र पाच हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या किमान दोन केंद्रे स्थापन करण्यात येईल. शहरी भागासाठी आपले सरकार केंद्रासाठी महानगरपालिका व नगरपरिषद १० हजार लोकसंख्येसाठी एक केंद्र स्थापन करण्यात येईल.

आपले सरकार सेवा केंद्र अर्ज मागणी १ ते ३० जानेवारी २०२४, अर्जाची छाननी ३१ जानेवारी ते १४ फेब्रुवारी २०२४, अर्जावर जिल्हास्तरीय कार्यवाही १५ ते २९ फेब्रुवारी २०२४ असणार आहे.

रायगड जिल्ह्यात एकूण ९८९ आहेत. ग्रामीण कार्यरत केंद्र ७५१, शहरी कार्यरत केंद्र १२३ असून ग्रामीण रिक्त केंद्र ३०६, शहरी रिक्त केंद्र १२ आहे. आपले सरकार सेवा केंद्राबाबत माहितीसाठी माहिती व तंत्रज्ञान कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

# पाताळगंगा नदीपात्रात आढळला मृतदेह

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोलीतून उगमस्थान असणाऱ्या पाताळगंगा नदीपात्रात छत्रपती शाहू महाराज विद्यालयाचे लेखापाल महेंद्र गुढे यांचा मृतदेह शुक्रवारी (दि. २९) आढळून आला आहे.



गुढे हे मागील पाच वर्षे मधुमेह आजाराने त्रस्त होते, तर तीन वर्षांपूर्वी अपघातात गंभीर जखमी झाले होते. गुढे यांचा मृतदेह खोपोलीपासून सहा किमी अंतरावर असणाऱ्या खालापूर स्मशानभूमीलगत पाताळगंगा नदीपात्रात शुक्रवारी दुपारी २ वा. सुमारास आढळून आला. घटनास्थळी खालापूर पोलीस, खोपोली अग्निशमन दलाचे प्रमुख मोहन मोरे, शाहू महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक मोहन पाटील व कर्मचारी दाखल झाले होते. मृतदेह खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले आहे.

# रायगड किल्ल्यावर पर्यटकांची गर्दी

## पोलीस यंत्रणा व पुरातत्त्व विभागाचे सुरक्षारक्षक सज्ज

**महाड : रामप्रहर वृत्त**

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी व नववर्षाचे स्वागतासाठी रायगड किल्ल्यावर पर्यटकांची गर्दी वाढू लागली आहे. रायगडावर येणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये, याकरिता पोलीस यंत्रणा व पुरातत्त्व विभागाचे सुरक्षारक्षक सज्ज आहेत.

रायगडावर अनेक पर्यटक येण्यास पसंती देतात. रायगड किल्ला हे पवित्र ठिकाण असल्याने येथे शिवप्रेमी व कुटुंबासह येणाऱ्यांची संख्या अधिक असते. गडाचे पावित्र्य राखूनच गडावर वावरले पाहिजे, असा शिवप्रेमींचा दंडक असल्याने नववर्ष साजरे करताना मर्यादा न पाळणाऱ्यांना शिवप्रेमींच्या रोषाला सामोरे जावे लागते. आता पोलिसही गडावरील हालचालींवर लक्ष ठेवून आहेत.



**छत्रपती शिवराय महाराष्ट्राचे दैवत असल्याने गडावर कोणताही गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही. रायगड किल्ला व महत्त्वाच्या ठिकाणी दरवर्षीप्रमाणे चोख पोलीस बंदोबस्त ठेवला जाणार आहे. गडाचे पावित्र्य येथे येणाऱ्या प्रत्येकाने राखावे.**

**–आर. पी. मायने, पोलीस निरिक्षक, महाड**

# महाड ज्येष्ठ नागरिक संघाचा वर्धापन दिन

**महाड : प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरिक संघ महाडचा २०वा वर्धापन दिन महाडमधील गुजराथी समाज बहुउद्देशीय सभागृहात आनंदी वातावरणात झाला. या वेळी कर्तृत्ववान ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला महाडमधील प्रसिद्ध व्यापारी दत्ताभाई महादेव मेहता हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे दत्ता मेहता, ठाणे येथील डॉ. व्हि. टी. मेहता, सुजाता मेहता, भारती सावंत, विलास आंबुर्ले, आदित्य कुलकर्णी, ज्येष्ठ नागरिक संघ महाडचे अध्यक्ष सुभाष शेठ, उपाध्यक्ष अरुण मशेटे, सचिव डॉ. चंद्रकांत दोसी, सहसचिव शर्मिला धारप, कोषाध्यक्ष संतोष शेठ आदी मान्यवर होते. ज्येष्ठ नागरिक संघ महाडचे अध्यक्ष सुभाष शेठ यांनी प्रास्ताविक केले. या वेळी त्यांनी ज्येष्ठ नागरिक संघ महाडच्या



गेल्या २० वर्षांतील कार्याचा थोडक्यात आढावा घेतला.

या वर्धापन दिनाचे औचित्य साधून ज्या सभासदांचा जन्म १९४८ साली झाला अशा सभासदांचा मान्यवरांचे हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ नागरिक संघ महाडचे सभासद भारत मेहता यांची महाडमधील जनकल्याण सहकारी पतसंस्थेचे संचालक म्हणून नुकतीच नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे त्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

ठाणे येथील प्रसिद्ध डॉ. व्हि. टी. मेहता, सुजाता मेहता यांचा सुर माझा... ध्यास माझा हा मराठी व हिंदी गाण्यांचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात भारती सावंत, विलास आंबुर्ले, आदित्य कुलकर्णी यांनीही चांगली साथ दिली. सुजाता मेहता यांनी उत्तम प्रकारे निवेदन केले. प्रारंभी प्रमुख पाहुणे व मान्यवरांचे हस्ते प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरवात झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शर्मिला धारप यांनी केले.

# खोपोली मुख्याधिकाऱ्यांची रस्ता दुरूस्तीसाठी तत्परता

**खोपोली : प्रतिनिधी**

शहरातील महात्मा फुले मंडईकडे जाणाऱ्या रस्त्याच्या, त्याचप्रमाणे मुख्याधिकारी यांच्या निवासस्थानाच्या समोर गटारावर टाकलेल्या स्टीलच्या सळई बाहेर निघाल्याने किरकोळ अपघातांची मालिका सुरू होती.



ही घटना सोशल मीडियावर टाकल्यानंतर नव्याने रुजू झालेल्या मुख्याधिकारी पंकज पाटील यांनी तत्काळ बांधकाम खात्याला दुरुस्तीचे आदेश दिले व काही तासांतच संपूर्ण दुरुस्ती करण्यात आल्याने नागरिकांनी आभार मानले आहेत.


अर्जदारातर्फे वकील कु. सोनिया ना. शिरसाठ

दिवाणी चौकशी अर्ज नं. ९३१ /२०२३

ने.ता.२२/१/२०२४

**मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साहेब सी.बी.डी. बेलापूर वाशी यांचे न्यायालयात**

**जाहीर नोटीस**

**लाला मोहम्मद दावूद शेख** .................... **अर्जदार**

आणि

**मुनी दावूद शेख, व इतर २** .................... **जाबदार**

सर्व लोंकाना या नोटिसद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी, **कै. दाऊदमिया अब्बास अली शेख** यांचे **दि. ०५.११.२०२२ रोजी घर नं. ४८०१, हनुमान नगर, तुर्भे नाका, तालुका– ठाणे, जिल्हा– ठाणे, महाराष्ट्र** येथे निधन झाले. असून त्यांचे कायदेशिर सरळ वारस म्हणून अर्जदार **श्री. बाबू शरणप्पा सोनकांबळे रा. घर नं. ४८०९, हनुमान नगर, तुर्भे नाका, तालुका– ठाणे, जिल्हा– ठाणे, महाराष्ट्र** यांनी खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारसा दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

घर नं. ४८०१, हनुमान नगर, तुर्भे नाका, नवी मुंबई – ४००७०३.
(लेखा क्रं. VA 0001673324) (सर्वे पावती क्र. डी झेड जी III 1313)

वरील अर्जदार हे मयत **कै. शरणाप्पा हुच्चप्पा सोनकांबळे** यांचे वारस आहेत, या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीला हरकत असल्यास, त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, या मे. कोर्टात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे मे. कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जा कामी पुरावा घेण्याची कार्यवाही करील.

तसेच अर्जदार हे **कै. दाऊदमिया अब्बास अली शेख** यांचे वारस असल्याने शाबीत झाले तर त्यांस वारसादाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि. २९/१२/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्कयासह दिली.

**सही/–**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा. अधिक्षक**
दिवाणी कनिष्ठ स्तर न्यायालय
बेलापूर, नवी मुंबई


# अलिबाग तालुका विज्ञान प्रदर्शनाला सुरुवात

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग तालुक्यातील सारळ येथील विद्यालयात तालुका विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनाचा उद्घाटन सोहळा गुरुवारी (दि. २८) पार पडला.

समाजासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान हा उद्देश समोर ठेवून पंचायत समिती शिक्षण विभाग, जनता शिक्षण मंडळ माध्यमिक शाळा सारळ, यांच्या संयुक्त विद्यमाने उपक्रम राबविण्यात आला.

या वेळी सारळच्या सरपंच अमृता नाईक, सहाय्यक गटविकास अधिकारी मंगेश पाटील, शाळा समिती सदस्य ऋषिकेश नाईक, सुशील पाटील, विजय साळुंखे, माजी सरपंच अमृता पाटील, उपशिक्षणाधिकारी सुनील भोपाळे, गटशिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा,



प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हा अध्यक्ष राजेंद्र म्हात्रे, प्राथमिक शिक्षक संघाचे तालुकाध्यक्ष प्रमोद भोपी, सारळ हायस्कूलचे मुख्याध्यापक, दत्तराज यावलकर, केंद्र प्रमुख देविदास थळे, विज्ञान अध्यापक मंडळ अलिबागचे अध्यक्ष वैशाली पाटील, गणित अध्यापक मंडळाचे अध्यक्ष अनुपमा चवरकर, सर्व केंद्रप्रमुख, साधन व्यक्ती, विशेष शिक्षक, माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.

# वनक्षेत्रांत विशेष लक्ष द्यावे

## उपवनसंरक्षक राहुल पाटील यांचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

नवीन वर्षाचे स्वागत करण्यामध्ये अतिउत्साही पर्यटकांकडून कोणताही अनुचित प्रकार घडू नये याची दक्षता घ्यावी, असे निर्देश उपवनसंरक्षक अलिबाग राहुल पाटील यांनी दिले आहेत.

नवीन वर्षाचे स्वागतासाठी वनक्षेत्रातील गडकिल्ले, समुद्रकिनारी, वनांमध्येही पार्टीचे नियोजन करण्यात येते. अशा ठिकाणी अमली पदार्थांचे सेवन, धुम्रपान त्यामुळे वनक्षेत्रांत वणवे लागणे, रात्री उशिरापर्यंत मोठ्या आवाजात गाणी वाजवणे यामुळे वन्यप्राण्यास त्रास होतो. अशा घटना टाळण्यासाठी प्रभावी नियंत्रण ठेवणे आवश्यक असल्याने या सर्व गोष्टींवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपवनसंरक्षक अलिबाग अधिनस्त असलेले वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना वनक्षेत्रातील गस्त वाढविण्याच्या सूचना देऊन, अनियमितता आढळल्यास तात्काळ कारवाई करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.


**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाचा भुखंड अ) १) कै. हिराजी कृष्णा घरत (मयत) व कै.मंगूबाई हिराजी घरत (मयत) यांचे वारस १/१) भरत हिराजी घरत १/२) हरेष हिराजी घरत २) कै. जनार्दन संभा घरत (मयत) यांचे वारस २/१) श्रीमती अनुबाई जनार्दन घरत २/२) श्री. दामोदर जनार्दन घरत २/३) श्री. जगदिश जनार्दन घरत २/४) श्री. तुषार जनार्दन घरत २/५) सुशिला किसन ठाकुर २ / ६) आशा रामदास म्हात्रे

ब) १) श्री. तुकाराम रामा घरत (मयत) यांचे वारस १/१) श्रीमती कुसुम तुकाराम घरत १/२) श्री. चंद्रहास तुकाराम घरत १/३) श्री. हिराजी तुकाराम घरत १/४) श्री. संतोश तुकाराम घरत १/५) श्री. मारूती तुकाराम घरत १/६) श्रीमती अहिल्या लक्ष्मण ठाकुर १/७) श्री. विश्वास तुकाराम घरत १/८) श्री. नरेश तुकाराम घरत १/९) श्रीमती वंदना संजय ठाकुर

क) १) कै. नारायण दत्तु म्हात्रे (मयत) यांचे वारस व कै. बयोबाई नारायण म्हात्रे (मयत) यांचे वारस १/१) रमाकांत नारायण म्हात्रे १/२) कै. विनायक नारायण म्हात्रे (मयत) यांचे वारस अ) श्रीमती प्रभावती विनायक म्हात्रे ब) श्री. निलेश विनायक म्हात्रे १/३) श्रीमती. देवता ज्ञानेश्वर पाटील १/४) श्री योगिता यदुनाथ घरत १/५) श्रीमती नलिनी रामा पाटील १/६) श्रीमती. हर्षलता दयानंद ठाकुर १/७) श्रीमती. निर्मला नंदकुमार कडू

ड) १) कै. नारायण पांग्या म्हात्रे ( मयत ) यांचे वारस १ / १) श्री. कमळाकर नारायण म्हात्रे १/२) श्रीमती मंजुळा रमेश मोकल १/३) श्रीमती. अंजनी परशुराम ठाकुर १/४) श्रीमती. मनिषा मदन पवार

इ) कै.शंकर शामल कडु (मयत) यांचे वारस व कै. सावित्री शंकर कडु (मयत) यांचे वारस १) श्री.अशोक शंकर कडु २) श्री. प्रकाश शंकर कडु ३) श्रीमती. मथुरा धावजी पाटील ४) श्रीमती. रंजना मदन पाटील ५) श्रीमती. रेखा विश्वानाथ म्हात्रे

ई) १) परशुराम रामदास तांडेल (मयत) १/१) हसुराम पुरषोत्तम तांडेल १/२) भिमाबाई पुरषोत्तम तांडेल १/३) विजय पुरषोत्तम तांडेल १/४ ) वंदना जनार्दन नाईक १/५) प्रदिप पुरूषोत्तम तांडेल १/६) चंद्रलाल पुरषोत्तम तांडेल
१) वामन हाल्या ठाकुर (मयत) १/१) लक्ष्मण वामन ठाकुर १/२) कमळाकर वामन ठाकुर १/३)नारायण वामण ठाकुर (मयत) यांचे वारस ३/१) विदयाधर नारायण ठाकुर ३/२ ) सूरज नारायण ठाकुर ३/३) कल्पना नारायण ठाकुर ३/४) प्राजक्ता जगदीश पाटील १/४) निळकंठ वामण ठाकुर (मयत) यांचे वारस ४ / १) राहुल निळकंठ ठाकुर ४/२) चंपाबाई नीलकंठ ठाकुर ४/३) सुमती धनेश थळी ४/४) अर्चना जातेश तांडेल ४/५) छाया समाधान मढवी यांचेकडून विकसन तथा भाडेपट्टा मालकी हक्क हस्तातरण आणि अनूशगीक कराराने कायम स्वरूपी आमचे अशिलांचे लाभात हस्तांतरीत करूण घेण्याचे योजले आहे.

**भुखंडाचे वर्णन**

| भूखंड क्रमांक | सेक्टर क्रमांक | क्षेत्र चौ.मी. | नोड |
|---|---|---|---|
| २ | ५ | २४८१ | जे.एन.पी.टी. |

वर नमूद भूखंडास अनुसरून कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न–वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे मालकी अथवा इतर कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरूपासहित प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात, सदर २१ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर वर नमूद भूखंड विकसन तथा भाडेपट्टा मालकी हक्क हस्तातरण आणि अनूशगीक त्रिपक्षीय कराराने आमचे आशीलांचे लाभात कायदेशीरपने हस्तांतरीत करून घेतील / पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

दिनांक २९/१२/२०२३
ठिकाण नवी मुंबई

**सही/–**
**ॲड. शरद जाधव**

संपर्कासाठी पत्ता : तळमजला, रॉयल प्राईड बिल्डींग, भुखंड क्र. ११३, मिडल क्लास को.ऑप.हौ. सोसायटी, पनवेल – ४१०२०६, ता. पनवेल, जि. रायगड. मो.नं. ९८२०६३७१७५

# उरणमध्ये वाहनचोरांचा सुळसुळाट

**उरण : रामप्रहर वृत्त**

औद्योगिकीकरण वाढल्याने उरण शहरासोबत उरण ग्रामीण भागातील परिसराचा आवाका दिवसागणिक वाढत आहे. नोकरी धंद्यानिमित्त उरण शहरात परप्रांतीय नागरिक राहण्यास आल्याने तालुक्याची लोकसंख्या वाढली आहे. त्यामुळे शहरीबरोबरच ग्रामीण भागात सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजनांची नितांत गरज आहे, मात्र उरण परिसरातील काही ग्रामीण भाग सीसीटिव्ही सारख्या मुलभूत सुविधेपासून अजूनही वंचित असल्याने वाहनचोरांचे फावले आहे.



उरण शहरासोबतच नजीकच्या गावातदेखील बाजारपेठा विस्तारल्या आहेत. वाढते औद्योगिकरण पाहता उरण शहराच्या तुलनेत ग्रामीण भागात घर कमी भाड्यात मिळत असल्याने परप्रांतीय नागरिक मोठ्या संख्येने उरणमधील ग्रामीण भागांत स्थिरावत आहेत, पण वाढत्या लोकसंख्येचे दुष्परिणाम सध्या ग्रामीण भागांतील रहिवाशांना सोसावा लागत आहे. कारण सध्या ग्रामीण भागात चोऱ्यांचे प्रमाण अधिक वाढले असून रस्त्याच्या कडेला असणाऱ्या वाहनांचे पार्ट चोरी करून विक्री करणाऱ्या टोळ्या सक्रिय आहेत. त्यामुळे कष्ट करून हप्त्यांवर घेतलेल्या गाड्यांचे पार्ट चोरीला जात असल्याने गोरगरीब नागरिकांना अनेकांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे.

उरण परिसरात पुनाडे, वशेणी, सारडे, पिरकोन, पाले, गोवठणे, आवरे, पाणदिवे, कळंबुसरे, चाणजे, पाणजे याप्रमाणे अनेक ग्रामपंचायतीच्या हद्दीत कोणत्याही प्रकारचे सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने वाहनाचे पार्ट चोरी करणाऱ्या चोरट्यांचे फावले आहे. कॅमेरे नसल्याने या चोरट्यांविरुद्ध कोणत्याही प्रकारचा पुरावा नसल्याने चोरांवर कायद्याची दहशतच नाही. त्यामुळे चोऱ्यांचे प्रमाण दिवसागणिक वाढतच आहे. त्यामुळे सीसीटीव्ही कॅमेरे बसवल्यानंतर या घटनांना आळा बसेल, अशी ग्रामस्थांना अपेक्षा आहे.

**शहरासह ग्रामीण भागातही सुरक्षा हवी**

**उरण शहरातील ८५ ठिकाणांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जाणार आहेत. यात एनएडी पट्रोल पंप, एनएमएमटी बस स्टॉप, स्वामी विवेकानंद चौक केगावकडे जाणारा रस्ता एनआय हायस्कूल चौकजवळ, विमला तलाव, गणपती मंदिर चौक रस्ता, राजपाल नाका, पालवी हॉस्पिटल रोड, आनंदनगर रस्ता, चारफाटा, जरीमरी मंदिर, राघोबा मंदिर, कामठा चौक, जामा मशीद, उरण, बोरी स्मशानभूमी, महात्मा गांधी पुतळ्याजवळ, गांधीचौक, बोरीचौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ, पिरवाडी समुद्र किनारी सीसीटीव्ही कॅमेरे बसणार आहेत. ग्रामीण भागातही सीसीटिव्हींची मागणी होत आहे.**

**उरण परिसरातील ग्रामीण भागांत हल्ली वाहनांचे भाग चोरीचे प्रकार वाढले आहेत. ग्रामीण भागांतील रस्त्यांवर सीसीटीव्ही नसल्याने हे प्रकार होत आहेत. सुरक्षेच्या उपाय-योजनांची गरज आहे.**

**–मकरंद पाटील, स्थानिक**

# विकसित भारत संकल्प यात्रेला दिघा-ऐरोली विभागात प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात २७ डिसेंबरपासून विकसित भारत संकल्प यात्रेला सुरुवात झाली असून दिघा येथे झालेल्या यात्रेच्या शुभारंभावेळी एक हजाराहून अधिक नागरिकांनी सहभागी होत उत्साही प्रतिसाद दिला. या वेळी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी केलेल्या आवाहनास अनुसरुन दिघा विभाग कार्यालयाजवळील दुपारच्या दुसऱ्या सत्रातही परिसरातील नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहून विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती जाणून घेतली तसेच काही नागरिकांनी अर्ज भरले व योजनांचा लाभही घेतला.



*योजनांची माहिती देणारे स्टॉल*

*पंतप्रधान महोदयांच्या संकल्पनेतून राबविल्या जाणाऱ्या विकसित भारत संकल्प यात्रेमध्ये एलईडी व्हॅनव्दारे पंतप्रधान महोदयांचा संदेश प्रसारित केला जात असून केंद्र सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती दिली जात आहे. याशिवाय तेथे केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची माहिती देणारे व अर्ज नोंदणी करणारे स्टॉल लावण्यात आले असून नागरिक या स्टॉलला भेटी देऊन योजनांची माहिती जाणून घेत आहेत तसेच अर्जही दाखल करून घेतले जात आहेत.*

२७ डिसेंबर रोजी दुपारी ३ ते ६ या वेळेत दिघा विभाग कार्यालयाजवळ झालेल्या यात्रेच्या दुसऱ्या सत्रात माजी आमदार संदीप नाईक यांनी उपस्थित राहून योजनांचा लाभ घेण्याचे व जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत यात्रेची माहिती पोहचविण्याचे आवाहन केले. या वेळी सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. कैलास गायकवाड यांच्यासह उपस्थितांनी 'आपला संकल्प विकसित भारत' शपथ ग्रहण केली. याठिकाणी परिमंडळ २ विभागाचे उपायुक्त डॉ. श्रीराम पवार, सहा.आयुक्त जयंत जावडेकर, माजी नगरसेवक नवीन गवते, अपर्णा गवते आणि लोकप्रतिनिधी उपस्थित होते. या ठिकाणी ५२१ नागरिकांनी नोंद करुन यात्रेच्या उपक्रमात सहभाग घेतला.

अशाचप्रकारे २८ डिसेंबर रोजी, सकाळी १० ते १ या वेळेत यादवनगर, ऐरोली येथे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार म्हसाळ यांच्या उपस्थितीत नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील विकसित भारत संकल्प यात्रेचे दुसऱ्या दिवसाचे पहिले सत्र १ हजार १८० नागरिकांच्या मोठया संख्येने उपस्थितीत उत्साहाने संपन्न झाले. ऐरोली विभागाचे विभाग अधिकारी तथा सहा. आयुक्त अशोक अहिरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या नियोजनबध्द व्यवस्थेमुळे इतक्या मोठया प्रमाणात गर्दी जमूनही यात्रेचा कार्यक्रम अत्यंत व्यवस्थित रितीने पार पडला. यावेळी माजी नगरसेवक रामआशिष यादव व इतर लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

शुक्रवारी ही यात्रा इच्छापूर्ती गणेश मंदिर, ऐरोली येथे तसेच दुपारच्या दुसऱ्या सत्रात पल हॉस्पिटल जवळ, ऐरोली येथे आयोजित केली होती. यामध्ये नागरिकांना योजनांची माहिती व त्याचे लाभ उपलब्ध करून देण्यात आली तर शनिवारी (दि. ३०) सकाळी १० ते १ या वेळेत, ऐरोली विभाग कार्यालय तसेच दुपारी ३ ते ६ या वेळेत नमुंमपा शाळा क्र.५५, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, रबाळे येथे यात्रेचा कार्यक्रम होणार आहे. मोठ्या संख्येने या यात्रेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आर्ट ऑफ लर्निंगच्या योग स्पर्धेला प्रतिसाद




**नवी मुंबई : बातमीदार**

योग प्रशिक्षणात अग्रेसर असलेल्या आर्ट ऑफ लर्निंग फाऊंडेशनच्या वतीने घेण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय योग स्पर्धेला देशातील आणि विदेशातील स्पर्धकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. ही स्पर्धा नेरुळ येथील आगरी कोळी सांस्कृतिक भवनमध्ये पार पडली.

सुदृढ आरोग्यासाठी योगाचा प्रसार करण्यात नेहमी आघाडीवर असलेल्या आर्ट ऑफ लर्निंग फाऊंडेशनच्या माध्यमातून प्रत्येक वर्षी ही स्पर्धा घेतली जाते. यंदा या स्पर्धेत मोठ्या संख्येने स्पर्धक सहभागी झाले. ही स्पर्धा फाऊंडेशनच्या अध्यक्षा योगगुरू डॉ. रिना अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली झाली.

या वेळी डॉ. प्रताप मुदलीयार, दिनेश अग्रवाल,डॉ सुभाष हिरा, बांधकाम व्यावसायीक राजेश प्रजापती, संजीव सुर्यवंशी, डॉ. अलोक मिश्रा, डॉ. नमीता मिश्रा, डॉ. संजय साटम, प्रकाश जावळे आदी उपस्थित होते.

# जुईनगरमध्ये महिलांना प्रमाणपत्र वाटप

**नवी मुंबई :** जुईनगर येथे सुसाशन दिवस साजरा करण्यात आला. माजी नगरसेवक काशिना पाटील व भाजप उपाध्यक्ष डॉ. राजेश ज. पाटील यांच्या माध्यमातून भारतरत्न, पद्मविभूषण व भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंती निमित्ताने जुईनगर येथे शिवण कलासेस, ब्युटी पार्लर, मेहंदी क्लासेस, फॅशन डिजाईनिंग अश्या विविध कोर्सेस केलेल्या व त्यामध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व महिलांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

या वेळी जिल्हा उपाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांनी अटल बिहारी वाजपेयी यांची संपूर्ण राजकीय व सामाजिक जीवनावर संपूर्ण माहिती दिली. तसेच राज्यसरकार व केंद्रसरकार चालवत असलेल्या विविध योजनांची माहिती देऊन सर्व नागरिकांपर्यंत ह्या योजना पोहचविण्याचे काम सर्व कार्यकर्त्यांनी करावे, असे आवाहन त्यांनी उपस्थित महिलांना केले. या वेळी भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# मोहोपाडा येथे जलजीवन मिशन अंतर्गत कामाचे भूमिपूजन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'हर घर जल हर घर नल' या उद्देशाने जलजीवन मिशन अंतर्गत कामाचा भूमिपूजन सोहळा मोहोपाडा स्मशानभूमीजवळ आयोजित करण्यात आला होता.

वासांबे ग्रामपंचायतीच्या सरपंच उमा मुंढे यांच्या प्रयत्नाने व स्थानिक आमदार महेश बालदी यांच्या पाठपुराव्याने जलजीवन योजनेचे भूमिपूजन ज्येष्ठ नागरिक व ग्रामसुधार मंडळाचे अध्यक्ष प.ग. पळनीटकर यांच्या हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आले. या जलजीवन योजनेंतर्गत सरपंच उमा मुंढे यांनी वासांबे परिसरातील पाणी प्रश्नासाठी २०२०पासून प्रयत्न करीत असून त्याला अखेर यश आले आहे.



मोहोपाडा ग्रामपंचायत हद्दीत साठ हजारांपेक्षा जास्त लोकसंख्या असून येथील वाढती लोकसंख्या व शहरीकरण पाहता परिसरात पाण्याची कमतरता भासत आहे. याकरिता वासांबे विभागासाठी २२ कोटीचा निधी केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्याकडून उपलब्ध झाला आहे. सध्या पाणी एमआयडीसीकडून घ्यावे लागत आहे, परंतु काही काळाने वासांबे ग्रामपंचायतीसाठी स्वतंत्र पाणी पुरवठा ग्रामस्थांसाठी उपलब्ध होणार आहे. याकरिता ८८ गुंठे जागा वन विभागाने ग्रामपंचायतीला दिली असून नविन पोसरी मोहोपाड्यासाठी१० लाख लिटर, दुर्गामाता– गणेशनगर ते रिससाठी १६ लाख लिटर व तळेगाव पानशीलसाठी एक लाख लिटर पाणी क्षमता असणाऱ्या अत्याधुनिक पाणी शुध्दीकरण प्लांट ग्रामपंचायतीतर्फे उपलब्ध होणार आहे. यामुळे रसायनीकरांची पाण्याची टंचाई दूर होणार आहे. प्रत्येक घरात नळ या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या योजनेचा लाभ नागरिकांना लवकरच मिळणार आहे. या वेळी प्रकल्प अधिकारी श्री. जगताप, सरपंच उमा मुंढे, उपसरपंच भूषण पारंगे, माजी सरपंच संदीप मुंढे, मनसे रायगड जिल्हा उपाध्यक्ष दीपक कांबळी, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रदिप पाटील, माजी राजिप सदस्य सुरेश म्हात्रे, माजी सरपंच सचिन तांडेल, माजी सरपंच रोशन राऊत, आर. के. कांबळे, ग्रामपंचायत सदस्य प्रशाली एकनाथ खाने, दीपक कांबळे, मथुरा गोपाळे, आकाश जुईकर, रसिका खराडे, प्रतिक्षा राऊत, राकेश खारकर, वेदिका पाटील, केदार भोईर, माया पाटील, कविता मांडे, ताई पवार, वनिता पारंगे, संगिता भोईर, स्वप्नाली मैदर्गीकर, वर्षा पाटील,अनिल पिंगळे, माजी उपसरपंच दत्ता शिंदे, संतोष मांडे, मारूती खाने, संदीप म्हात्रे, विनोद पाटील, चेतन जाधव, अजित सावंत आदी उपस्थित होते.

या वेळी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष चौधरी यांनी केले.

# मॉडर्न स्कूलमध्ये स्काऊट गाईड शिबिर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांध्ये स्वावलंबनाचे मूल्य रुजविले जावे यासाठी मॉडर्न स्कूल वाशी येथील स्काऊट गाईड शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



विद्यार्थ्यांमध्ये स्व ची जोपासना व्हावी. त्याचप्रमाणे विनयशीलता, बंधुभाव, सहकार्यवृत्ती, चिकाटीपणा, एकाग्रता , परिश्रम या मूल्यांचा विकास व्हावा यासाठी दरवर्षी रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील मॉडर्न स्कुल मध्ये स्काऊंट गाईड शिबिराचे आयोजन केले जाते. यावर्षी सुद्धा २९ व ३० जानेवरी रोजी विद्यालयाच्या प्रांगणात हे शिबिर झाले.

या वेळी विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासोबत शरीरिक विकास होण्याआसाठी स्काउट गाईड चळवळीचे जनक बेडन पॉवेल यांनी सांगितलेल्या बी पी व्यायाम प्रकार व साहसी कार्यक्रम सुद्धा घेण्यात आले.

शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे शहरात राहणाऱ्या या मुलांनी चक्क चुलीवर स्वयंपाक बनविला. शेकोटी कार्यक्रमाने शिबिराची सांगता करण्यात आली.

या शिबिराला विद्यालयाच्या प्राचार्य सुमित्रा भोसले, पर्यवेक्षिका मनीषा सकापाळ, हना सरेला, आबासाहेब वाघ यांनी भेट दिली. यावेळी स्काउट मास्टर मेघनाथ मढवी, कुमार भोईर, जयसिंग पवार, गाईड मास्टर मीनाक्षी मोरे, करुणा कडू, मंजुषा साळुंखे, नंदिनी मोगल यांच्यासह विदयार्थी उपस्थित होते.

# पर्यटकांची पावले सुट्ट्यांमुळे उद्यानांकडे

**खारघर : रामप्रहर वृत्त**

निसर्गरम्य शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खारघरमधील सेंट्रल पार्कमध्ये सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी पर्यटकांची वर्दळ असते. मात्र, नाताळ सणानिमित्त शाळा आणि कॉलेजला सुट्टी असल्यामुळे नवी मुंबई, पनवेल, तळोजा ग्रामीण परिसर आणि शिळफाटा, मुंब्रा परिसरातील पर्यटकांमुळे उद्यान फुलून गेले आहे. नाताळ सणानिमित्त सध्या शाळा आणि कॉलेजला सुट्यांमुळे खारघरमधील सेंट्रल पार्कमध्ये पर्यटकांची गर्दी वाढल्याचे चित्र आहे.

उद्यानात भारतीय संस्कृतीची ओळख व्हावी यासाठी लोकसंगीताची माहिती देणाऱ्या पखवाज, पेटी व इतर वाद्यांच्या कलाकृतींची उभारणी केली होती, मात्र सिडकोच्या दुर्लक्षामुळे या उद्यानाला अवकळा आली होती. आता सिडकोने नव्याने उद्यान विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. या उद्यानातील मोकळ्या मैदानात फुटबॉल, बॅडमिंटन खेळण्यासाठी पसंती मिळत आहे.



**निसर्गरम्य वातावरण असलेले सेंट्रल पार्क सुंदर आहे. चारही बाजू हिरवाईने नटलेले उद्यान आहे. या शिवाय मुलांना खेळण्यासाठी उद्यानात मोठ्या प्रमाणात जागा आहे. सिडकोने बांधा वापरा हस्तांतर करा, या अटीवर उद्यान विकसित करून सर्व सेवा उपलब्ध करून द्याव्यात.**

**–संतोष राठोड, नावडे**

**सिडकोने नव्याने सेंट्रल पार्क विकसित करताना पाणपोई, खाद्यपदार्थ, स्वच्छतागृह आणि चिल्ड्रन पार्ककडे लक्ष देण्याची गरज आहे. पनवेलमहापालिका हद्दीतील सर्वांत मोठे उद्यान असल्यामुळे याकडे लक्ष देण्याची गरज आहे.**

**–फुलाजी ठाकूर, सामाजिक कार्यकर्ते**

# डॉ. लहानेंच्या हस्ते ग्रंथालयांसाठी ग्रंथभेट

**नवी मुंबई : बातमीदार**

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्यावर प्रकाशित झालेल्या प्रकाशवाटा, समिधा, नेगल, रान मित्र आणि चांदणे उन्हात हसले या पाच पुस्तकांचे ७५ संच पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांच्या हस्ते ७५ ग्रंथालयांसाठी ग्रंथभेट सोहळा झाला. हा कार्यक्रम वाशी सेक्टर ६ येथील साहित्य मंदिर सभागृहात झाला.

कार्यक्रमाचे आयोजन आनंदवन मित्र मंडळ, नवी मुंबई व प्रभात चॅरिटेबल ट्रस्ट, नवी मुंबई यांच्या माध्यमातून करण्यात आले होते. सुरवात अमर दूडाम याच्या आनंदवन प्रार्थना गायनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्थाविक डॉ. प्रशांत थोरात यांनी केले तर आभार सुभाष कुळकर्णी यांनी केले. या वेळी ठाणे ग्रंथालयाचे प्रशांत पाटील, डॉ. अजित मगदुम, डॉ. अशोक पाटील, प्रा प्रताप महाडीक, थळे सर, मधुकर वारभुवन आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन जीवन निकम यांनी केले तर सूत्रसंचालन अमरजा चव्हाण यांनी केले.



# दारावे गावात अतिक्रमणांवर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांविरोधात सिडकोच्या अतिक्रमणविरोधी विभागाने धडक मोहीम सुरू केली आहे. सीवूड्स करावे गाव सेक्टर २३मध्ये २७ डिसेंबरला एका आरसीसी इमारतीच्या चालू बांधकामांवर कारवाई केली. बांधकाम तोडण्यात आले. त्यामुळे या अनधिकृत बांधकामाविरोधात लढणाऱ्या ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

नवी मुंबई महापालिकेच्या नेरूळ विभागाच्या हद्दीत सिवूड्स दारावे गावात एका विकासकाने ७८४ चौरस मीटर क्षेत्रफळाचे बांधकाम सुरू केले होते. सिडकोच्या अतिक्रमण विभागाने पोलीस बंदोबस्तात कारवाई केली. कारवाईत पोकलेन, जेसीबीच्या साह्याने आरसीसी बांधकाम आणि भिंती तोडल्या. एमआरटीपी ५४ (१) अंतर्गत बांधकामधारकाविरोधात सिडकोच्या वतीने नोटीस बजावली होती, मात्र त्या नोटिसीला न जुमानता हे बांधकाम विकासकाने सुरूच ठेवले होते. याविरोधात ग्रामस्थांनीदेखील सिडकोकडे पत्रव्यवहार केले होते.



सिडकोचे अनधिकृत बांधकामे अतिक्रमण विभागाचे मुख्य नियंत्रक संजय जाधव, सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या आदेशानुसार अनधिकृत बांधकामे विभागाचे नियंत्रक वेणू नायर यांच्या उपस्थितीत पोलिस बंदोबस्तात धडक कारवाई केली. कारवाईसाठी एक पोकलेन, एक जेसीबी, पाच मजूर, पर्यवेक्षक, चार जीप तसेच सिडको सुरक्षारक्षक, सिडको पोलीस पथक, स्थानिक पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी यांच्या कडक बंदोबस्तात इमारतीचे चालू बांधकाम सिडकोने उध्वस्त केले.

## निवडक



### अध्यक्षपदी संदीप जठारी बिनविरोध

**रोहे** : श्री स्वामी समर्थ सहकारी पतसंस्थेची २०२३-२४ ते २०२८-२९ या आर्थिक वर्षासाठी कार्यकारिणीची निवडणूक अध्यासी अधिकारी एस. एल. कावले यांच्या अधिपत्याखाली झाली. या निवडणुकीमध्ये अध्यक्षपदी संदीप जठारी यांची तर उपाध्यक्षपदी लक्ष्मण चांदगांवकर यांची बिनविरोध निवड झाली. या वेळी संचालक उषा चांदगांवकर, सीमा ठाकरे, गणेश सदावर्ते, गंगाराम कोकळे, अर्जुन गोरिवले, रामदास सुरळकर, सुरेश मोरे, चंद्रकांत जाधव, गजानन गायकर, सखाराम कराळे उपस्थित होते. नवनिर्वाचित अध्यक्ष संदिप जठारी यांनी संस्थेचे कर्मचारी वृंद, दैनिक बचत प्रतिनिधी व आजवर संस्थेस सक्रिय पाठींबा देणारे सभासद, ग्राहक आणि हितचिंतकांचे आभार व्यक्त केले.

### सायराबानू चौगुले यांना साहित्यभूषण



**माणगाव** : कवयत्री सायराबानू वजीर चौगुले यांना अष्टपैलू संस्कृती कला अकादमी मुंबई यांच्यातर्फे आळंदी येथे साहित्यभूषण पुरस्काराने ज्येष्ठ समाजसेवक, कवी, लेखक मधुसूदन घाणेकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. संस्थापक शिवाजी किसन खैरे यांच्या अष्टपैलू संस्कृती कला अकादमी मुंबई आयोजित राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धेत सलग तीन वर्षे कवयत्री सायराबानू चौगुले यांनी काव्यलेखन करून उत्तम कविता सादर केल्या. या साहित्य कलेच्या सन्मानार्थ त्यांना संस्थेच्या न्यायप्रभात राज्यस्तरीय काव्यगौरव सन्मान सोहळ्यात मानाचे वस्त्र, प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व न्यायप्रभातचा मासिक अंक देऊन गौरविण्यात आले. त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### ऑनलाईन पोर्टलवर नोंदणीसाठी मुदतवाढ

**रायगड** : पणन हंगाम २०२३-२४मध्ये किमान आधारभूत खरेदी योजनेंतर्गत धान व भरडधान्य खरेदीकरीता ऑनलाईन पोर्टलवर शेतकरी नोंदणीकरीता ३१ डिसेंबर २०२३ अखेरपर्यंत मुदत देण्यात आली होती, परंतु ऑनलाईन पोर्टलवरील माहितीनुसार, शेतकरी नोंदणी पुरेशी न झाल्याने १५ जानेवारी २०२४ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनावणे यांनी दिली आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा.

# पुलांच्या माध्यमातून जलसंवर्धन गरजेचे -ना. रवींद्र चव्हाण

## पेणमधील पुलांच्या बांधकामांचे भूमिपूजन

**पेण : प्रतिनिधी**

पुलांच्या माध्यमातून दोन भागांना दोन शहरांना जोडण्याबरोबर जलसंवर्धन करणेही काळाची गरज आहे. ज्या ठिकाणी शक्य होईल तेथे पुलाबरोबर जलसंवर्धनासाठी बंधारे बांधण्याचे काम पुढील काळात होणार असल्याचे प्रतिपादन माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी केले.

त्याचप्रमाणे पेणचे विद्यमान आमदार रविशेठ पाटील आणि माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या पाठपुराव्यामुळेच आज विविध विकासकामे झाली असल्याचेही ते म्हणाले. तालुक्यातील भोगावती आणि बाळगंगा नदीवरील विविध ठिकाणच्या पुलांच्या बांधकामांचे भूमिपूजन मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २८) करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.





कार्यक्रमासाठी आमदार रविशेठ पाटील, भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार धैर्यशील पाटील, जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, अ‍ॅड. नीलिमा पाटील, माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, डी. बी.पाटील, प्रभाकर म्हात्रे, सरपंच दर्शना पाटील आदींसह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पेण बोरगांव येथील पेण-खोपोली रस्त्यावर भोगावती नदीवर मोठ्या पुलाचे भूमिपूजन, पेण-बोरगांव रोड इजिमा ५६ भोगावती नदीवर पुलाच्या बांधकामाचे भूमिपूजन, अंतोरे ते सापोली रस्त्यावर भोगावती नदीवर पुलाचे भूमिपूजन, दुरशेत ते खरोशीदरम्यान बाळगंगा नदीवर मोठ्या पुलाचे भूमिपूजन आणि जोहे-रावे कासारभट पुलाचे भूमिपूजन या वेळी झाले.

मंत्री रवींद्र चव्हाण पुढे म्हणाले की, भूमिपूजन झालेल्या पुलांचे काम लवकरात लवकर पूर्ण होऊन नागरिकांसाठी उपलब्ध होतील. पुलांची निर्मिती दोन भागांना जोडण्यासाठी होते. ज्या ज्या ठिकाणी पूल होतील तेथे जलसंवर्धन केले जाईल. २८ हजार पाणीटंचाईग्रस्त गावांचा अहवाल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागवला, नद्यांचे खोलीकरण केले. रायगडात तीन मेट्रिक टन गाळ काढला गेला. हे फक्त ब्रिज नसून तर गावांना पाणी पुरवणारी व्यवस्था आहे. उद्योजकांनी पुढे येऊन हे कार्य पुढे घेऊन गेले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले. या वेळी आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार धैर्यशील पाटील यांनीदेखील मार्गदर्शन केले.

## शासन आपल्या दारी कार्यक्रमासाठी सर्वांनी योगदान द्यावे -जिल्हाधिकारी डॉ. म्हसे

**रायगड : प्रतिनिधी**

शासनाच्या विविध योजना खेड्यापाड्यातील जनतेपर्यंत पोहचाव्यात यासाठी शासनातर्फे सर्व पातळ्यांवर प्रयत्न केले जात आहेत. लाभार्थ्यांना पात्रतेनुसार शासकीय योजनांचे लाभ मिळून त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, या उद्देशाने ५ जानेवारी २०२४ रोजी माणगाव तालुक्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ येथे शासन आपल्या दारी या जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाबाबत माहिती देतांना जिल्हाधिकारी म्हसे पुढे म्हणाले, अनेक नागरिक हे शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र असूनही ते केवळ संबंधित शासकीय कार्यालयापर्यंत पोहोचू शकत नसल्यामुळे शासनाच्या योजनांपासून वंचित राहतात.



शासकीय योजनांसाठी पात्र असलेले लाभधारक व शासन यांच्यामध्ये अधिक समन्वय व्हावा व जबाबदार शासनाचा प्रत्यय सर्वसामान्यांना मिळावा, यासाठी शासनाने शासन आपल्या दारी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी ७५ हजार लोकांचे नियोजन करण्यात आले असून या लोकांना ने-आण करण्यासाठी एक हजार बसेसचे नियोजन करण्यात आले आहे, तसेच एक हजार खासगी वाहनांचेही नियोजन केले आहे. या कार्यक्रमासाठी १२ एकर जाग्यावर मंडप उभारण्यात येणार आहे. या मंडपामध्ये विविध शासकीय विभागांचे स्टॉल उभारण्यात येणार आहेत. यामध्ये सर्व शासकीय विभागांचे दाखले वाटप करण्यात येणार आहे. एक एकर जागेत कृषी प्रदर्शन स्टॉल उभारण्यात येणार असल्याचे सांगून म्हसे पुढे म्हणाले की, जिल्ह्यातील असलेल्या एक हजार ५०० औद्योगिक कंपन्यांचे सुरक्षाविषयक मार्गदर्शनाचे प्रदर्शन उभारण्यात येणार आहे, तसेच आरोग्याच्या दृष्टीने आरोग्य चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरात कॅन्सर आजाराच्या निदानासंबंधी टाटा मेमोरियलशी समन्वय साधून त्यावर विशेष लक्ष दिले जाणार आहे. जिल्ह्यातील हा कार्यक्रम सर्वात मोठा कार्यक्रम होणार आहे. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आवश्यक पूर्वतयारी सुरू आहे.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्यातील महसूल, कृषी, आरोग्य, रोजगार व स्वयंरोजगार, कामगार, दिव्यांग यांसह विविध शासकीय विभागांमार्फत देण्यात येणाऱ्या शासकीय योजनांचे लाभ विक्रमी संख्येने लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचा संकल्प जिल्हा प्रशासनाने केला आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून शासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. म्हसे यांनी केले आहे.

## उपनगरीय रेल्वे प्रवासी सल्लागार समिती जाहीर



**कर्जत : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने आपल्या उपनगरीय रेल्वेस्थानकात प्रवासी सल्लागार समिती गठीत करीत असते. मेनलाईनवरील कर्जत एंडकडून नेरळ, माथेरान आणि भिवपुरी रोड या स्थानकातील उपनगरीय प्रवाशांची नावे सल्लागार समिती सदस्य म्हणून जाहीर केली आहेत.

नेरळ प्रवासी सल्लागार समितीमध्ये नेरळ प्रवासी सल्लागार समितीचे अध्यक्ष असलेले संदीप म्हसकर, नितीन कांदळगावकर, संतोष शिंगाडे, योगेश ठक्कर, प्रमोद डबरे, अमित जैन यांचा समावेश आहे, तर भिवपुरी रोड प्रवासी सल्लागार समितीमध्ये राजेश भगत, रोशन पाटील, दर्शन कांबरी, अक्षय बुंधाटे, गुरुनाथ पाटील, धनंजय थोरवे, शोभा शेंडे यांचा समावेश आहे. या सर्वांना रेल्वेचे नेरळ परिसर निरीक्षक शिरीष कांबळे यांचे हस्ते पत्र देण्यात आले.

माथेरान रेल्वेस्थानक प्रवासी सल्लागार समितीमध्ये प्रदीप घावरे, प्रवीण सकपाळ, चंद्रकांत जाधव, आकाश चौधरी आदींचा समावेश आहे. या सर्व सदस्यांची मुदत १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीसाठी असणार आहे.

## नेरळमध्ये पुरस्कार सोहळा उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ येथील हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृहात स्वातंत्र्य सैनिक गोमाजी रामा पाटील प्रतिष्ठानचे वतीने पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन केले होते. इतिहास संशोधक वसंत कोळंबे यांचे व्याख्यानही या वेळी झाले.



हुतात्म्यांचे नातेवाईक असलेल्या ८५ वर्षीय अनुसया जामघरे, डॉ. सोन्या पाटील, कर्जत तालुका आगरी समाज संघटना अध्यक्ष सुरेश टोकरे, माजी अध्यक्ष सावळाराम जाधव, ठाणे जि. प. सदस्य विठ्ठल डामसे, मुरबाड नगरसेविका दिक्षिता वारघडे, भिवंडी येथील कवी सुनील पाटील, शरद भगत, आदर्श विद्यालय मुख्यध्यापिका सुचेता शिरसाट उपस्थित होते.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष कल्पेश भोईर यांनी मान्यवरांचे स्वागत केले. प्रास्ताविक दिपक घीगे यांनी केले. कार्यक्रमात डॉ. रोहिदास दुसार, गुरूनाथ मधुकर घुडे, प्रा. गोरख माळी, गोविंद पिंपळगावकर, अ‍ॅड. प्रवीण रघुनाथ पाटील, डॉक्टर्स व इंजिनिअर्स फाउंडेशन, कवी राजेश कंटे, पंढरीनाथ पांढरे, सुधीर कराळे, पॉवर लिफ्टर अमृता भगत, नेहा आढाव आणि शांताराम घिगे यांचा सन्मान करण्यात आला.

इतिहास संशोधक वसंत कोळंबे यांनी, प्रतिष्ठानच्या कार्यात तरुणांनी सहभागी झाले पाहिजे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सोन्या पाटील यांनी, हुतात्मा हिराजी पाटील यांच्या घराचा प्रश्न आपण मार्गी लावू, असे जाहीर केले.

## अंजुमन इस्लाम जंजिरा संस्थेचा वर्धापन दिन उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा या संस्थेची स्थापना १९०७ साली झाली. ११६ वर्षे पूर्ण झाली आहे. या संस्थेचा वर्धापन दिन डिसेंबर शुक्रवारी (दि. २९) मुरूड येथे संस्थेच्या मुख्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. अंजुमनचा झेंडा संस्थेचे सचिव हिफझुररेहमान नझीरी यांच्या हस्ते फडकवून तराणा-ए-अंजुमनच्या गायनासह आरएसपी पथकाच्या मानवंदनेत संस्थेचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यानंतर प्रभातफेरीही काढण्यात आली.

कार्यक्रमासाठी संस्थेचे सहसचिव रहीम कबले, खजिनदार अल्ताफ मलिक, कायदेशीर सल्लागार अ‍ॅड. शादाब काटे, प्रायमरी शाळा चेअरमन हाफिजू कबले, आयटीआय चेअरमन समीर दौनाक, डिग्री कॉलेज ऑफ सायन्स व्यवस्थापन समितीचे सदस्य तौसिफ फत्ते, मुख्याध्यापिका रक्षणदा खतीब, कॉलेज प्राचार्य जाहिद गोठेकर व अंजुमन डिग्री कॉलेज ऑफ सायन्सचे प्र. प्राचार्य डॉ. साजिद शेख आदी उपस्थित होते.



## खोपोलीतील शेततळ्यात अडकलेल्या सापांना जीवदान

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील तांबाटी ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या शेततलावात अडकलेल्या सापांना सर्पमित्रांच्या सहाय्याने बाहेर काढून जीवदान देण्यात आले.

या शेततलावाच्या शेजारी असणाऱ्या डोंगरावरील वणवा विझवताना वनविभागाचे कर्मचारी आणि गावकऱ्यांना शेततळ्यात रात्रीच्या अंधारात हालचाल होताना दिसली. त्यांनी विजेरीच्या प्रकाशात अंदाज घेतला असता काही साप तलावात पडलेले पाहिले. दुसऱ्या दिवशी दिलीप बांगरा याने तलावात एकूण सात साप असल्याचे त्यांना कळविले. तलावात अडकून पडलेल्या सापांना वर काढण्यासाठी सर्पमित्रांची मदत घेण्याचे ठरले, त्यानुसार स्नेक रेस्क्यूअर्स आणि अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेच्या सदस्यांना त्या ठिकाणी पाचारण केले.

तलावात अडकून पडलेल्या सापांपैकी सहा साप हे घोणस जातीचे विषारी तर एक



नानेटी जातीचा बिनविषारी साप होता. ते साप खूप वेळ पाण्यात असल्याने त्यांची हालचाल मंदावलेली दिसत होती, सापांना तलावात असलेल्या गुळगुळीत प्लास्टिकच्या आवरणामुळे वर येण्यास जमत नव्हते. सुमारे दोन तासांच्या प्रयत्नानंतर सर्व सापांना सुरक्षितरित्या बाहेर काढणे शक्य झाले.

दिनेश ओसवाल, अमोल ठकेकर, सुशील गुप्ता, अशोक मेस्त्री, शुभम कंगळे, महेश भोसले, धर्मा पाटील आणि गुरुनाथ साठेलकर यांनी योजनाबद्ध रीतीने हे रेस्क्यू ऑपरेशन पूर्ण केले.

## रायगडच्या सुक्या मासळीला पर्यटकांची पसंती

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

काही पर्यटनस्थळे तेथील नावीन्यपूर्ण वस्तू आणि खाद्यपदार्थ, फळांसाठी प्रसिद्ध असतात. पर्यटक त्या वस्तू आवर्जून खरेदी करतात. त्याचप्रमाणे रायगड जिल्ह्यात कुटुंबासह आलेले पर्यटक येथील सुक्या मासळीच्या खरेदीला पसंती देत आहेत.



सुकी मासळी बारमाही उपलब्ध असते. पर्यटक बंदरात वाळत ठेवलेल्या वाकट्या, बोंबील, कोळंबीचे सोडे, सुकट यांची मोठ्या प्रमाणात खरेदी करतात. सुकी मासळी अनेक दिवस टिकत असल्याने जास्तीत जास्त दिवस पुरेल इतका साठा करण्यासाठी जणू काही जणांमध्ये स्पर्धा लागते. नाताळनिमित्त आलेल्या पर्यटकांकडून साधारण चार ते पाच कोटींहून अधिक रुपयांची उलाढाल झाल्याचा अंदाज विक्रेत्यांकडून वर्तवण्यात आला आहे.

हिवाळ्यात रायगड जिल्ह्यात इतर कोणतीही फळे तयार झालेली नसतात. त्यामुळे परतीच्या प्रवासात काय नेणार अशा विवंचनेत असलेले पर्यटक विशेषतः महिला सुकी मासळी खरेदी करण्यात सर दाखवतात. वरसोली, नागाव, काशीद, मुरूड आणि श्रीवर्धन समुद्रकिनारी आलेल्या पर्यटकांमुळे यंदा उलाढाल कोट्यवधींत गेली आहे. सुकी मासळी किनाऱ्यावरील कोणत्याही गावात सहज उपलब्ध होणारी आहे. इतर ठिकाणांपेक्षा येथे चांगल्या दर्जाची आणि माफक किमतीत सुकी मासळी मिळते.

सुक्या मासळीला वाढती मागणी लक्षात घेऊन, काही महिला विक्रेत्यांनी प्रमुख मार्गावरच दुकाने थाटली आहेत. वरसोली, किहीम समुद्रकिनारी तर सुकी मासळी टोपलीत घेऊन विकणाऱ्या महिला सर्वत्र दिसतात. दरात थोडीफार घासाघीस केल्यास माफक दरात चांगली मासळी मिळते. एका ग्राहकाने खरेदी केल्यावर त्याच्यासोबतचे इतरही खरेदी करतात, त्यामुळे बघता बघता काही हजारांचा माल काही मिनिटात संपत असल्याचे विक्रेते सांगतात.

**आमच्याकडेही सुकी मासळी मिळते, मात्र दर जास्त असतात शिवाय दर्जाही सुमार असतो. ती ताजी वाटत नाही शिवाय चवही फारशी चांगली नसते. कोकणात पहिल्यांदाच पर्यटनाला आल्यावर येथे सुका म्हावरा विकणाऱ्या महिला दिसल्या. गाडी स्वतःची असल्याने सुकट, वाकट्या आणि कोळंबीचे सोडे घेऊन जात आहोत.**
**-सागरिका देशपांडे, पर्यटक, नाशिक**

**बाहेरून येणारे गिऱ्हाईक दरात खूपच घासाघीस करतात, पण एकदा योग्य दर झाल्यावर काही हजार रुपयांची खरेदी एकदाच होते. मासळी विकण्यासाठी जास्त फिरावे लागत नाही. यातून स्थानिक मच्छीमारांना चांगले उत्पन्न मिळत असल्याने समुद्रकिनाऱ्यावर ग्रामपंचायतींनी आमच्यासाठी येथे कायमस्वरूपी स्टॉल उभारून द्यावेत.**
**-सुगंधा नाकवा, विक्रेती, वरसोली**

## पोलादपूर पोलीस ठाण्यातर्फे दत्तजयंती उत्सवानिमित्त महाप्रसाद

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर एसटी स्थानकालगतच्या श्रीदत्त मंदिरातील जयंती उत्सवामध्ये पोलादपूर सहाय्यक पोलीस निरिक्षक युवराज म्हसकर यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मवारी वर्गाने श्रीसत्यनारायणाची महापूजा आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या वेळी पोलीस उपनिरिक्षक यु. डी. धुमास्कर यांनी सपत्नीक महापूजा केली.

महामार्गाच्या चौपदरीकरणानंतर नवीन पोलीस ठाण्याच्या इमारतीमध्ये कामकाज हलविण्यात आले. यानंतर या जुन्या इमारतीलगतच्या श्रीदत्त मंदिरामध्ये दरवर्षीप्रमाणे दत्तजयंती उत्सव सुरू ठेवण्याचे काम पोलीस कर्मचारी बांधव व भगिनींनी केले आहे. या वेळी पोलीस कर्मचारी भोसले, जाधव, कदम, सरणेकर, जयश्री सरणेकर तसेच सहकाऱ्यांनी पोलीसांच्या वतीने उपस्थित भाविकांना महाप्रसादाची व्यवस्था चोख ठेवली.



# कसोटीतील दुसऱ्या सामन्यात पाकिस्तानचा दारूण पराभव

## ऑस्ट्रेलियाने जपली २८ वर्षांची परंपरा

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

२८ वर्षांची परंपरा कायम राखत ऑस्ट्रेलियाने पुन्हा एकदा पाकिस्तानचा दारूण पराभव केला. कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानचा ७९ धावांनी पराभव केला. या मालिकेतील ऑस्ट्रेलियाचा हा सलग दुसरा विजय आहे.

मेलबर्न येथे झालेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ३१८ आणि दुसऱ्या डावात २६२ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात पाकिस्तानने पहिल्या डावात २६४ आणि दुसऱ्या डावात २३७ धावा केल्या. खरं तर पाकिस्तानला मागील २८ वर्षांमध्ये एकदाही ऑस्ट्रेलियाच्या धरतीवर विजय मिळवता आला नाही. ऑस्ट्रेलियन कर्णधार पॅट कमिन्सने १० बळी घेतल्याने त्याला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.



दरम्यान, पहिल्या सामन्याप्रमाणे दुसऱ्या सामन्यातही शेजाऱ्यांची अवस्था बिकट झाली. पाकिस्तानने पहिल्या डावात सर्वबाद २६४ धावा केल्या होत्या. कर्णधार शान मसूदने ५४ धावांची अर्धशतकी खेळी केली. बाबर आझम या डावात फ्लॉप ठरला. तो केवळ एक धाव करून बाद झाला. तर, मोहम्मद रिझवानने ४२ धावांची आणि सौद शकीलने ६२ धावांची खेळी केली. ऑस्ट्रेलियाकडून गोलंदाजी करताना कर्णधार पॅट कमिन्सने ५ बळी घेतले. याशिवाय नॅथन लायनने चार बळी घेऊन पाकिस्तानच्या फलंदाजीची कंबर मोडली.

### ख्वाजा आणि वॉर्नरने योगदान

ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात सर्वबाद ३१८ धावा केल्या होत्या. यजमान संघाकडून मार्नस लाबूशेनने १५५ चेंडूंचा सामना करत ६३ धावा केल्या. तर, सलामीवीर उस्मान ख्वाजाने ४२ आणि डेव्हिड वॉर्नरने ३८ धावांचे योगदान दिले. मिचेल मार्शने ४१ धावा केल्या. यादरम्यान पाकिस्तानकडून गोलंदाजी करताना झमालने सर्वाधिक ३ बळी घेतले. तर शाहीन आफ्रिदी, मीर हमजा आणि हसन अली यांना प्रत्येकी २-२ बळी घेण्यात यश आले.

मिचेल मार्शने दुसऱ्या डावात ऑस्ट्रेलियासाठी शानदार फलंदाजी केली. त्याने १३० चेंडूंचा सामना करत ९६ धावा कुटल्या. मार्शने या खेळीत १३ चौकार मारले. तर, लेक्स कॅरी (५३) आणि स्टीव्ह स्मिथ (५०) धावा करून बाद झाला. पाकिस्तानकडून शाहीन आफ्रिदी आणि मीर हमजा यांनी प्रत्येकी ४ बळी घेतले, तर जमालने २ बळी घेतले.

पाकिस्तानला मालिकेत बरोबरी साधण्यासाठी आणि दुसरा सामना जिंकण्यासाठी ३१७ धावांची गरज होती. मात्र, शेजाऱ्यांना सर्वबाद केवळ २३७ धावा करता आल्या. या डावात कर्णधार शान मसूद सर्वाधिक ६० धावा करून बाद झाला. बाबर आझमने ४१ धावांची सावध खेळी केली. तर, रिझवानने ३५ धावांचे योगदान दिले. या मालिकेतील पाकिस्तानी संघाचा सलग दुसरा पराभव झाला अन् २८ वर्षांची परंपरा कायम राहिली. ऑस्ट्रेलियाकडून पॅट कमिन्सने दुसऱ्या डावातही कमाल केली. त्याने १८ षटकात ४९ धावा देत ५ बळी पटकावले. लक्षणीय बाब म्हणजे कमिन्सने दोन्ही डावात ५-५ बळी घेऊन सामनावीर पुरस्कार पटकावला.



# १४ वर्षाखालील मुलांच्या स्पर्धेत रायगडचा पश्चिम विभाग संघावर विजय

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या आमंत्रितांच्या १४ वर्षाखालील मुलांच्या स्पर्धेत रायगड क्रिकेट असोसिएशन संघाने दुसऱ्या सामन्यात पश्चिम विभाग संघावर निर्णायक विजय मिळवला.



रायगडाने हा सामना डाव व ५० धावांनी जिंकला. पंकज इटकर याने कर्णधाराला साजेसा खेळ करत ४५ धावा आणि ११ बळी घेतले. पहिल्या सामन्यात ३ व दुसऱ्या सामन्यात ७ गुण असे रायगडचे दोन सामन्यात मिळून १० गुण मिळवले. तिसरा सामना ३१ डिसेंबरला विस्डोम संघाबरोबर आहे.

या सामन्यात रायगड संघाने प्रथम फलंदाजी करताना ५७ षटकात २२२ धावा केल्या. सुरुवातीला पडझडी नंतर साहिल पोपेटा ५६, पंकज इरकर ४५, अथर्व पाटील ३२, आर्यन निकाळजे २९, वेदांत कडू २६ धावा यांनी धावसंख्या सर्व बाद २२२ वर नेली. पश्चिम विभागाकडून आयुष रोटे याने २० षटकात ४ बळी मिळवले.

पश्चिम विभागाचा पहिला डाव ३२ षटकात ७५ धावांत संपला. पार्थ म्हात्रे याने १७ धावा केल्या. रायगडकडून अथर्व पाटील १५ धावत ५ बळी तर पंकज इटकर याने १२ धावात ४ बळी मिळवले. रायगडने पश्चिम विभागाला फॉलोऑन दिला. पश्चिम विभागाचा दुसरा डाव ३५ षटकात सर्वबाद ९७ वर आटोपला. आयुष रोटे याने २६ धावा केल्या. रायगडकडून कर्णधार पंकज इटकर याने १३ षटकात २८ धावा देत ७ बळी मिळवले. रायगड संघाने या सन्यात निर्णायक विजय मिळवला.

# दुसऱ्या कसोटी सामन्यापूर्वी शमीच्या जागी आवेशला संधी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सेंच्युरियनमध्ये खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटीत दक्षिण आफ्रिकेने भारताचा पराभव केला. या विजयासह आफ्रिकन संघाने मालिकेत १-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. आता मालिकेतील दुसरी आणि शेवटची कसोटी ३ जानेवारीपासून केपटाऊनमध्ये खेळवली जाणार आहे. या कसोटीसाठी बीसीसीआयने संघात एक बदल केला आहे. बोर्डाने वेगवान गोलंदाज आवेश खानचा भारतीय कसोटी संघात समावेश केला आहे.

आवेश खानचा भारतीय कसोटी संघात मोहम्मद शमीच्या जागी समावेश करण्यात आला आहे. शमी दुखापतीमुळे मालिका सुरू होण्यापूर्वीच संघाबाहेर होता. त्यानंतरही बीसीसीआयने त्याच्या बदलीची घोषणा केली नव्हती.

याआधी सेंच्युरियनमध्ये खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटीत भारतीय संघाला एक डाव आणि ३२ धावांनी पराभव स्वीकारावा लागला होता. यानंतर आयसीसीने आणखी एक धक्का दिला आणि स्लो ओव्हर रेटसाठी भारतीय संघाचे दोन गुण कमी केले. या पराभवामुळे टीम इंडिया वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२३-२५ सायकलच्या पॉइंट टेबलमध्ये



पाचव्या स्थानावर घसरली, तर आयसीसीने दोन पॉइंट्स कमी केल्यामुळे टीम इंडिया आणखी एक स्थानाने सहाव्या स्थानावर घसरली आहे.

दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया या सेना देशांच्या भूमीवर टीम इंडियाचा हा सलग पाचवा पराभव होता. २०२२ मध्ये जोहान्सबर्गमध्ये भारताला सात विकेट्सनी पराभव स्वीकारावा लागला होता. त्याच वेळी, २०२२ मध्येच, केपटाऊनमध्ये दक्षिण आफ्रिकेचा पुन्हा सात विकेट्सने पराभव केला. यानंतर २०२२ बर्मिंगहॅममध्ये इंग्लंडने भारताचा सात विकेटने पराभव केला. २०२३ मद्ये, ओव्हल येथे झालेल्या जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने २०९ धावांनी पराभव केला होता. त्याचवेळी, आता पुन्हा एकदा दक्षिण आफ्रिकेने भारताचा एक डाव आणि ३२ धावांनी पराभव केला आहे.

# आयसीसीने भारतीय संघाला ठोठावला दंड

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सध्या भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेच्या धरतीवर कसोटी मालिका खेळत आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताला एक डाव आणि ३२ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. या पराभवानंतर टीम इंडियाला आणखी एका अडचणीचा सामना करावा लागला. खरं तर आयसीसीने भारतीय संघावर मोठा दंड ठोठावला आहे. टीम इंडियाला मॅच फीच्या १० टक्के दंड भरावा लागणार आहे. या पराभवानंतर भारतीय संघाचे जागतिक कसोटी चॅम्पियनशिपमधील दोन गुणदेखील कमी झाले आहेत.

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील कसोटी मालिकेतील सलामीचा सामना सेंच्युरियन येथे खेळवला गेला. या सामन्यात रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय



संघाने दोन षटके कमी टाकली. यामुळे टीम इंडियाचे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमधून दोन गुण वजा करण्यात आले आहेत. यासोबतच आयसीसीने मॅच फीच्या १० टक्के दंडही ठोठावला आहे. एमिरेट्स आयसीसी एलिट पॅनल ऑफ मॅच रेफरीच्या क्रिस ब्रॉड यांनी भारताला दोन षटके उशीराने टाकल्यामुळे हा दंड ठोठावला.

आयसीसीच्या नियमांनुसार, जर एखादा संघ निर्धारित वेळेत ठराविक षटके टाकू शकला नाही, तर तो स्लो ओव्हर रेटमुळे दंडास पात्र ठरतो. अशा स्थितीत खेळाडूंना प्रत्येक षटकासाठी मॅच फीच्या ५ टक्के दंड आकारला जातो. टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दोन षटके कमी टाकली. यामुळे भारताला मॅच फीच्या १० टक्के दंड ठोठावण्यात आला आहे.

दरम्यान, भारतीय संघ आताच्या घडीला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या क्रमवारीत सहाव्या स्थानावर आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पराभवामुळे भारताला मोठा फटका बसला आहे. मॅच फीसह त्यांचे २ गुणही कमी झाले आहेत. तर, दक्षिण आफ्रिका अव्वल स्थानावर आहे. याशिवाय पाकिस्तान दुसऱ्या, न्यूझीलंड तिसऱ्या तर बांगलादेश चौथ्या क्रमांकावर आहे.

# आवास येथे क्रीडा महोत्सवाचा शुभारंभ

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग तालुक्यातील बा.ना. हायस्कूल व ज्युनियर कॉलेज,



आवासमध्ये गुरुवारी (दि. २८) शालेय क्रीडा महोत्सवाचा शुभारंभ झाला. विद्यार्थ्यांनी खिलाडूवृत्तीचे प्रदर्शन करण्याची शपथ घेतली. मान्यवरांच्या हस्ते क्रीडांगणाचे पूजन करून श्रीफळ वाढवण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवन व स्वागतगीताने झाली. त्यानंतर मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन यथोचीत स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक बा.ना. हायस्कूल व ज्युनियर कॉलेज, आवासचे मुख्याध्यापक प्रमोद भगत यांनी केले. कार्यक्रमा प्रसंगी सुधीर राऊळ यांनी मनोगत व्यक्त केले व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन व आभार अजित नाईक यांनी मानले.

या शालेय क्रीडा महोत्सवात कबड्डी, खो - खो, लंगडी या स्पर्धांचे आयोजन करण्यत आले आहे. कार्यक्रमाला बा.ना.हायस्कूल व ज्युनियर कॉलेज, आवासचे मुख्याध्यापक प्रमोद भगत, पर्यवेक्षक अनिल दारकुंडे, सांस्कृतिक मंडळ अध्यक्षा दिव्या भगत, उपाध्यक्ष गणेश राणे, शिक्षक प्रतिनिधी सुनील मोरे, शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी नथुराम म्हात्रे, विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक महादेव कोळी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# २०२३मध्ये विराटने केला सर्वाधिक धावांचा विक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सेंच्युरियनमध्ये भारताने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना एक डाव आणि ३२ धावांनी गमावला. त्यामुळे टीम इंडियाचे दक्षिण आफ्रिकेत कसोटी मालिका जिंकण्याचे स्वप्न पुन्हा एकदा भंगले. दरम्यान, विराट कोहलीने २०२३ साली एक असा विक्रम आपल्या नावावर केला आहे, जो १४६ वर्षांच्या क्रिकेट इतिहासात आतापर्यंत कोणत्याही फलंदाजाने केला नाही. सर्वाधिक शतके आणि सर्वाधिक धावा करणारा महान खेळाडू सचिन तेंडुलकरही आपल्या कारकिर्दीत असा विक्रम करू शकला नाही.

खरंतर, विराट कोहलीने २०२३ सालची शेवटची इनिंग दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सेंच्युरियन येथे झालेल्या कसोटी सामन्यात खेळली होती. या डावात कोहलीने ७६ धावा केल्या आणि या धावांसह विराट कोहली २०२३ मध्ये २००० हून अधिक धावा करणारा खेळाडू ठरला. यामध्ये तिन्ही फॉरमॅटच्या धावांचा समावेश आहे. विराट कोहलीने यावर्षी एकूण २०४८ धावा केल्या आहेत. २०२३ मध्ये २००० हून अधिक धावा केल्यानंतर, विराट



कोहली सात कॅलेंडर वर्षांत २००० किंवा त्याहून अधिक धावा करणारा जगातील पहिला फलंदाज बनला आहे. या अगोदर हा विक्रम सहावेळा २०००हून अधिक धावा करणाऱ्या कुमार संगकाराच्या नावावर आहे.

विराट कोहलीने २०१२मध्ये पहिल्यांदा २००० हून अधिक धावा केल्या होत्या. त्यानंतर २०१६ ते २०१९ अशी सलग चार वर्षे विराट कोहलीने २००० हून अधिक धावा करण्याचा विक्रम केला, मात्र २०१९ नंतर विराट कोहलीची बॅट शांत झाली आणि त्यानंतर पुढील तीन वर्षे विराट कोहलीच्या बॅटने तशी कामगिरी केली नाही, ज्यासाठी तो ओळखला जातो. या काळात विराट कोहलीच्या बॅटमधून एकही शतक झळकले नाही, पण २०२२ मध्ये झालेल्या आशिया चषकादरम्यान विराट कोहलीने अफगाणिस्तानविरुद्ध शतकाचा दुष्काळ संपवला आणि आपल्या टी-२० कारकिर्दीतील पहिले शतकही झळकावले.

यानंतर विराट कोहलीची बॅट थांबली नाही आणि २०२३ मध्ये कोहलीने आयपीएलपासून वर्ल्ड कपपर्यंत प्रत्येक प्रकारच्या स्पर्धेत धावा केल्या. २०२३ च्या विश्वचषक स्पर्धेतही विराट कोहलीने सर्वाधिक ७६५ धावा केल्या आणि एकाच विश्वचषकात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रमही केला.











दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com